स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



समता न्याय एकात्मता

सामाजिक न्याय विभाग

ãñôçöõó ìõö

ïõãõöx q ·åôå í

óìç ïñóÁå óäôs

"ʋåì ¶ôÇõw"


ç›Öõs çõöx Èñô





महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग



# नावीन्याची संकल्पपूर्ती...

नावीन्यपूर्ण संकल्प आणि कार्यपूर्तींचा लेखाजोखा

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



समता न्याय एकात्मता
सामाजिक न्याय विभाग



**मा. ना.एकनाथ शिंदे**
मख्यमंत्री,



**मा.देवेंद्र फडणवीस**
उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



**मा.उदय सामंत**
पालकमंत्री,
रत्नागिरी जिल्हा



**सुमंत भांगे**
**(भा.प्र.से.)**
सचिव, सामाजिक न्याय
व विशेष सहाय्य विभाग



**डॉ.प्रशांत नारनवरे**
**(भा.प्र.से.)**
आयुक्त, समाज
कल्याण, पणे



**एम देवेंदर सिंग**
**(भा.प्र.से.)**
जिल्हाधिकारी, रत्नागिरी



**किर्ती किरण पुजार**
**(भा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प, रत्नागिरी



**वंदना कोचुरे,**
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण, मुंबई विभाग,
मुंबई



**यादव गायकवाड,**
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
आणि जिल्हा समाज कल्याण
अधिकारी जि.प.रत्नागिरी



**डॉ.बाबासाहेब आबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी**

राज्य हे दुर्बलतर जनवर्ग आणि
विशेषत: अनुसूचित जाती
व अनुसूचित जनजाती यांचे
विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व
आर्थिक हितसंवर्धन करील आणि
सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण
यांपासून त्याचे संरक्षण करील.

**अनुच्छेद ४६. भारताचे संविधान**

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.**

# दिशा
## गतिमान
# प्रशासनाची



## प्रस्तावना :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविल्या जाना-या विवीध योजना अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकांतील लोकांचे सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच त्यांचे जीवनमान/राहणीमान उंचावण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, कार्यालय रत्नागिरी द्वारे विवीध शिबीरांतुन तसेच विवीध जाहीरात व प्रसिध्दी माध्यमाद्वारे लोकांमध्ये जागृती निर्माण करून सदर योजनांचा लाभ घेणेसाठी लोकांना प्रोत्साहीत केले जाते.

मा. आयुक्त समाज कल्याण, पुणे यांच्या मार्गदर्शनाने अनु.जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत वसतीगृह प्रवेश, शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी व परराज्यात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच परदेशी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना देखील शिष्यवृत्ती प्राधान्याने दिली जाते. मागासवर्गीय वंचीत समाजातील दुर्बल घटकांतील लोकांना रमाई आवास योजनेच्या माध्यमातून त्यांचे राहणे व निवा-याचा प्रश्न सुटावा तसेच त्यांना सन्मानाने समाजामध्ये जगता यावे या उद्देशाने सदरच्या योजनेंचा लाभ दिला जातो.

सहायक आयुक्त, समाज कल्याण, कार्यालय रत्नागिरी द्वारे जिल्हयातील अधिनस्त सर्व मागासवर्गीय मुलां/मुलींच्या वसतिगृहामधील प्रवेशीत विद्यार्थ्यांना योग्य त्या सर्व सोईसुविधा पुरविणे, वेळेवर त्यांना निर्वाह भत्ता देणे. प्रवेशित विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडी-अडचणीचे निराकरण करणे. तसेच मागासवर्गीय दुर्बल घटकांतील लोकांवर होणा-या अन्याय अत्याचारामध्ये पिडीत असलेल्या अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तीना अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यातंर्गत योग्य ते आर्थिक सहाय्य देवून त्याना मानसीक आधार देण्याचे काम समाज कल्याण विभागाकडून केले जाते. जिल्ह्यामधील ज्येष्ठ नागरीकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांचे निराकरण करण्यात येते.

मागासवर्गीय वंचीत समाजातील दुर्बल घटकांतील लोकांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विवीध योजनांचा लाभ या वंचीत घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच ग्रामीण क्षेत्रात मागासवर्गीयांच्या वस्ती मध्ये विविध शिबीराचे अयोजन करून लोकांना योजनेची माहीती देणे. त्यामाध्यमातुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना शासनाच्या विविध कल्याण कारी योजनांचा लाभ देणे. शिष्यवृत्ती, रमाई आवास योजना, शासकीय वसतिगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, अनुसूचीत जाती उपघटक योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना, वसतिगृह प्रवेश, राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे इत्यादी महत्वपुर्ण योजनेचे जिल्हास्तरावर जाहीरात प्रसिध्दी करुन जास्तीत जास्त वंचीत घटकांपर्यंत योजनेचा लाभ पोहचवण्यासाठी समाज कल्याण विभाग प्रयत्नशील आहे.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शाखा | योजनेचे नांव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | **आस्थापना शाखा** | कर्मचारी कल्याण समिती स्थापना | |
| | | टपाल गोषवारा - झिरो पेन्डन्सी ॲण्ड डेली डिसपोजल | |
| | | सहा गठ्ठे पध्दती | |
| | | अभिलेख कक्ष | |
| 2 | **शिक्षण शाखा** | शिक्षण फी व परीक्षा फी योजना. | |
| | | परराज्यात शिक्षण घेत असलेल्या अनु. जाती विद्यार्थ्यांना मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती अदा करणे | |
| | | छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना | |
| | | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना | |
| | | समान संधी केंद्र (EQUAL OPPORTUNITY CENTER) | |
| | | मागासवर्गीय मुलां/मुलींचे शासकीय वसतिगृह योजना व प्रवेशित विद्यार्थ्यांचे मनोगत | |
| | | वसतीगृह व्यवस्थापनासाठी आदर्श गृहपाल यांची निवड करून त्यांचा सत्कार | |
| | | शासकीय वसतिगृहामध्ये - वाचन प्रेरणा उपक्रम | |
| | | शासकीय वसतिगृहामध्ये - संवाद उपक्रम | |
| | | आदर्श शासकीय वसतिगृह | |
| | | अनुदानित वसतिगृहे व विद्यार्थी मनोगत | |
| 3 | **मावक/नां.ह.सं. शाखा** | राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबत. | |
| | | तृतीय पंथीय व्यक्तीचे मनोगत | |
| | | जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती | |
| | | रमाई आवाय योजना (शहरी) - लाभार्थी मनोगत | |
| | | अनु.जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम - 1989 (ॲट्रॉसिटी ॲक्ट) | |
| | | आंतरजातीय विवाहित जोडप्यांना प्रोत्साहनपर आर्थिक अनुदान देणे योजना | |
| | | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125व्या जयंती वर्षानिमित्त ऐतिहासिक स्थळांचा विकास<br>योजनेअंतर्गत मौजे कापडगांव, ता.जि.रत्नागिरी | |
| | | प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना | |
| 4 | **अनु.जाती कल्याण** | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अंतर्गत केलेली कामे व मनोगत | |
| 5 | **अनु.जाती उपयोजना (SCP)** | अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेअंतर्गत घेण्यात आलेली कामे | |
| | | 3% नाविन्यपूर्ण योजना सन 2021-22 अंतर्गत अनुदानित वसतिगृहांना पुरवठा करण्यात आलेले संगणक व इतर साहित्य तसेच वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे मनोगत | |
| | | डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना | |
| | | डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतील लाभार्थ्यांचे मनोगत | |
| | | अनु.जातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचा गट पुरवठा करणेची योजना | |
| | | अनु.जातीच्या कुटुंबांना शेळया मेंढयांचे गट पुरवठा करणेची योजना | |
| | | अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये पथदीप उर्जीकरण योजना | |
| 6 | **लेखा निरीक्षण शाखा** | महालेखापाल प्रलंबित परिच्छेद / खात्यांतर्गत प्रलंबित परिच्छेद / भांडार पडताळणी प्रलंबित परिच्छेद | |
| 7 | **जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी** | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्य व मनोगते | |

| अ.क्र. | शाखा | योजनेचे नांव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 8 | **सेवा पंधरवडा उपक्रम** | सेवा पंधरवडा अंतर्गत माजी विद्यार्थी सन्मान सोहळा कार्यक्रम व जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यशाळा | |
| 9 | **प्रसिध्दी** | वृत्तपत्रांमधील बातम्यांची कात्रणे | |

## आस्थापना शाखा

### कर्मचारी सद्यस्थिती

कार्यालयीन कामकाज वेळेत पार पाडणेसाठी कर्मचारी वृंद हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्यांची मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे तसेच सदर कर्मचाऱ्यांची काम करण्याची कार्यक्षमता यावर कार्यालयाचे प्रशासकीय कामकाज पार पाडण्यात महत्वाची भूमीका असते.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी कार्यालयातील कर्मचारी सद्यस्थिती लक्षात घेता मंजूर अधिकारी/कर्मचारी संख्या-20, पैकी भरलेली संख्या-07 आहे. भरलेल्या पदांपैकी : सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण-01, सहा.लेखाधिकारी-01, समाज कल्याण निरीक्षक-01, वरिष्ठ लिपीक-01, क.लिपीक-02, संगणक ऑपरेटर (कंत्राटी)-01 अशी प्रत्यक्ष कार्यालयीन कामकाज करणेसाठी केवळ 05 पदे उपलब्ध असून 13 पदे रिक्त आहेत. म्हणजेच एकूण कर्मचाऱ्यांच्या 65% टक्के पदे रिक्त आहेत.

तसेच मागासवर्गीय मुलां/मुलींच्या शासकीय वसतीगृहाची सद्यस्थिती पाहता मंजुर अधिकारी/कर्मचारी संख्या-54, पैकी भरलेली-17 व रिक्त पदे-37 आहेत. या कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृहातील फक्त 33% पदे भरलेली असून 65% पदे रिक्त आहेत.

एकंदरीत पदांची सद्यस्थिती लक्षात घेता रत्नागिरी जिल्हयातील केवळ 23 कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत विविध योजनेची चागल्या प्रकारे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न चालू आहे.

## आस्थापना शाखा

### कर्मचारी कल्याण समिती स्थापना

**उपक्रम राबविण्याचा उद्देश :** सदर उपक्रम राबविण्याचा उद्देश कर्मचाऱ्यांचे कल्याण हा आहे. कर्मचाऱ्यांचे शासकीय सेवेतील विविध सेवाविषयक लाभ कर्मचाऱ्यांना विहीत वेळेत मिळणेसाठी सोयीस्कर व्हावे तसेच कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ नये व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्यांचे विहीत वेळेत निराकरण होऊन कर्मचाऱ्यांचा मानसिक समाधान होऊन प्रशासनात कार्यालयीन कामकाज करतांना कामाची स्थिरता, कामाची प्रत सुधारणे व कर्मचाऱ्यांचे हित साधणे.

**उपक्रम राबविण्यापुर्वीची परिस्थिती :** कर्मचारी कल्याण समिती स्थापन करण्यापुर्वी कर्मचाऱ्यांचे अनेक वैयक्तीक सेवाविषयक लाभ प्रशासनाच्या दप्तरी प्रलंबीत राहत होते. त्याचा वेळेत निपटारा केला जात नव्हता. त्यामुळे कर्मचाऱ्यांना सेवाविषयक व सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ मिळण्यास विलंब होत होता. कर्मचाऱ्यांच्या सदर समस्येचे निराकरण करणेची कोणतीही सोयीस्कर यंत्रणा नव्हती. कर्मचाऱ्यांना त्यांचे प्रलंबीत प्रकरणा बाबत अनेक वेळा पत्रव्यवहार केल्याशीवाय पर्याय शिल्लक नव्हता. तसेच कर्मचाऱ्यांना वेळेत सेवाविषयक लाभ न मिळाल्यामुळे त्याचा परिणाम कार्यालयीन कामकाजावर नकारात्मक परिणाम होत होता.

**उपक्रम राबविल्यानंतरची परिस्थिती :** कार्यालयीन कर्मचारी कल्याण समिती स्थापन करणे मा. उपायुक्त (प्रशासन) समाज कल्याण, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कार्यालय व शासकीय संस्था यामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या विविध सेवाविषयक बाबींचे स्थानिक स्तरावरून निराकरण होणेकरीता कार्यालयीन कर्मचारी कल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती वर्ग 3 संवर्गातील कर्मचारी यांची दरमहा कर्मचा-यांचे सेवा विषयक बाबीच्या अनुषंगाने अडीअडचणीचे निराकरण होणेकरीता उपायोजना करून त्यांचे प्रकरण निकाली काढणेची कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे परिष्ठ कार्यालयीन स्तरावर प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली निघण्यासाठी सोयीस्कर मार्ग निमार्ण झालेला आहे. कर्मचाऱ्यांना वैयक्तीक पत्रव्यवहार करण्यापेक्षा समितीकडून आपल्या समस्यांचे निराकरण करणेसाठी सुलभ जात आहे व कर्मचाऱ्यांची प्रशासनात नियमानुसार सेवाविषयक लाभ मंजूर करणेसाठी अडवणूक केली जात नाही. त्यामुळे कर्मचारी हा कार्यालयीन कामकाज करतांना आनंदी दिसून येत आहे.

**फलनिष्पत्ती :** या कार्यालयात समाज कल्याण निरिक्षक या पदावर कार्यरत असलेले श्रीमती विजया शंकर मोरे याचे समाज कल्याण निरिक्षक या पदावर सलग 10 वर्षे सेवा पुर्ण झालेली असलेमुळे त्याचा अश्वासित प्रगती योनेचा लाभ मिळणेसाठी त्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करणेत आला आहे.

**कार्यालयातील कर्मचारी यांचे मनोगत :** मी विजया शंकर मोरे, समाज कल्याण निरीक्षक या पदावर कार्यरत असून मला दि.30.03.2022 रोजी समाज कल्याण निरीक्षक या पदावर सलग 10 वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. मी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेसाठी पात्र आहे. त्याअनुषंगाने कर्मचारी कल्याण समितीमुळे माझ्या प्रस्तावाला वेळीच दाद देऊन वरिष्ठ कार्यालयास मंजुरीसाठी सादर केलेला आहे. याबद्दल कर्मचारी कल्याण समितीचे मी धन्यवाद व्यक्त करते.



## आस्थापना शाखा

### टपाल गोषवारा - झिरो पेन्डन्सी ॲण्ड डेली डिसपोझल


**उपक्रम राबविण्याचा उद्देश :** सदर उपक्रम राबविण्याचा उद्देश प्रशासनात गतिमानता येऊन कार्यालयास प्राप्त टपाल विहीत वेळेत निकाली काढणे हा आहे. सदर उपक्रमामुळे प्रशासनातील प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवडयात केलेल्या आपल्या कामकाजाचे वरिष्ठांना गोषवारा सादर करावा लागतो. त्यामुळे कर्मचारी आठवडयात जास्तीत-जास्त काम करण्याचा प्रयत्न करतो. तसेच कर्मचाऱ्यांकडे असलेल्या कामकाजाचा ओघ वरिष्ठांनी समजून घेऊन पदानुसार कामकाज वाटप करणे.

**उपक्रम राबविण्यापुर्वीची परिस्थिती :** सदर उपक्रम राबविण्यापुर्वी कार्यालयीन टपाल विहीत मुदतीत निकाली काढल्या जात नसल्याने टपाल मोठया प्रमाणावर प्रलंबीत राहत होते. तसेच प्रतिक्षाधीन प्रकरणांची संख्या वाढत होती. तसेच कार्यालयीन कामकाजामध्ये सुसूत्रता व गतिमानता नव्हती.

**उपक्रम राबविल्यानंतरची परिस्थिती :** मा. आयुक्त, महोदय समाज मा. उपायुक्त (प्रशासन) समाज कल्याण, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार या कार्यालयाअंतर्गत नियमित टपाल गोषवारा वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येतो. प्रत्येक कर्मचारी दर आठवडी टपाल गोषवारा सादर करत असल्यामुळे कार्यालयाचे प्रलंबित कामे ती किती याचे तात्काळ अवलोकन होत आहे. त्यामुळे प्रलंबित टपाल निपटारा करणेची कार्यवाही सुकर झालेली आहे.

**उपक्रम पुर्ण झाल्यानंतरची वस्तुस्थिती :**

| सन | प्राप्त टपाल | निपटारा केलेले टपाल | माहितीस्तव आलेले टपाल |
|---|---|---|---|
| 2020 | 2830 | 2118 | 712 |
| 2021 | 3092 | 1867 | 1225 |




**टिप :** कार्यवाही करण्याचे सर्व टपालांचा निपटारा करण्यात आला.

**फलनिष्पत्ती :** रत्नागिरी जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे प्रलंबित प्रकरणे असतात पण टपाल गोषवारा काढलेमुळे कोणते प्रकरण किती दिवसापासून प्रलंबित आहे याची तात्काळ अवलोकन होते. प्राधान्याने प्रकरण निकाली काढणेची कार्यवाही होती. अधिकारी कर्मचारी यांचे बैठकीत टपाल गोषवारा यावर चर्चा होवून प्रकरणे निकाली काढण्याचा सूचना केल्या जातात.

प्रकरणे निकाली काढली जातात. टपाल गोषवारा काढलेमुळे कार्यलयीन कामकाज करणेसाठी सुलभ झालेले आहे.

## आस्थापना शाखा

## सहा गठ्ठे पध्दती

**उपक्रम राबविण्याचा उद्देश :** कार्यालयीन कामकाज करतांना कामकाजामध्ये गतीमानता व सुसूत्रता येणे तसेच दस्तऐवजाची योग्य तऱ्हेने विगतवारी करून कार्यालयीन कामकाज करणे.

**उपक्रम राबविण्यापुर्वीची परिस्थिती :** सदर उपक्रम राबविण्यापुर्वी कार्यालयाचे सर्व दस्तऐवज संकलित ठेवल्या जात होते. त्यामुळे कार्यालयीन कामकाज करतांना सुसूत्रता दिसून येत नव्हती व कामकाज करतांना वेळीच दस्तऐवज कार्यवाही करणेसाठी उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे कामकाजाची गती मंदावलेली होती.

**उपक्रम राबविल्यानंतरची परिस्थिती :** सदर उपक्रम राबविल्यानंतर कार्यालयामध्ये सहागठ्ठे पध्दतीनुसार दस्तऐवज खालील प्रमाणे ठेवण्यात आले. त्यामुळे कामकाजामध्ये सुसूत्रता, गतिमानता व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेमध्ये सुधारणा झाली. सहा गठ्ठे पध्दती नुसार कार्यालयीन दप्तराची खालील प्रमाणे सहा गठ्ठयात विभागणी करण्यात आली.

- चालू पत्रव्यवहार
- प्रतिक्षाधीन प्रकरणे
- नियत कालिके
- स्थायी आदेश संचिका
- अभिलेख कक्षात पाठवावयाची प्रकरणे
- ड-वर्गीय पेपर्स

**उपक्रम पुर्ण झाल्यानंतरची वस्तुस्थिती :** उपक्रम राबविल्यानंतर कार्यायामधील कपाटातील दस्तऐवज/ फाईल यांचे योग्य तऱ्हेरे नियोजन करण्यात येऊन त्यामध्ये सुसूत्रता आली.



**फलनिष्पत्ती :** वरील वर्गीकरणामुळे कार्यालयीन कामकाज करतांना कर्मचाऱ्यांच्या वेळेचा अपव्यय टळतो व विहीत वेळेत प्रकरणांचा निपटारा करणे सोईचे होते.

## आस्थापना शाखा

### अभिलेख कक्ष

**उपक्रम राबविण्याचा उद्देश :** कोणत्याही शासकीय कार्यालयाचा कारभार सुरळीत हवा असेल, तर विविध प्रकारच्या अभिलेखांचे वेळेवर उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असते., त्यामुळे दस्तऐवजाचे वर्गीकरण व अदयावतीकरण करुन अभिलेख सुरक्षीत ठेवणे व ते जिर्ण होण्यापासून तसेच उंदीर, वाळवी यांचेपासून सुरक्षीत ठेवणे.

**उपक्रम राबविल्यानंतरची परिस्थिती :** कार्यालयाचा आत्मा असलेले अभिलेख कक्षांचे अद्ययावतीकरण करणे महत्वाचे असते मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार या कार्यालयात अभिलेखांचे निंदनीकरण, वर्गीकरण व अद्ययावतीकरण करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण असे कार्य प्राधान्याने करण्यात आले आहे. सदर अभिलेखे अदयावत करणेसाठी सर्व कर्मचारी यांनी चांगल्या प्रतिसाद दिलेला आहे.

**फलनिष्पत्ती :** --

- कार्यालयातील अभिलेख कक्षातील अभिलेखांचे निंदनीकरण, वर्गीकरण व अद्ययावतीकरण केल्यामुळे कार्यालयात स्वच्छता दिसून येते.
- प्राप्त, निर्गत आणि प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी वर्गवारी करून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे सोईचे झाले.
- अद्ययावत रेकॉर्ड रुम तयार करण्याचा फायदा कर्मचाऱ्यांना कामकाज करताना होत आहे.
- कर्मचाऱ्यांच्या टेबलवरील फाइल्सचा ढीग कमी झाला. कर्मचाऱ्यांना स्वच्छ वातावरणात काम करण्यास वाव मिळाला त्यामुळे कामाचा ताण कमी झाला.
- अभिलेखांची वर्गवारी केल्याने आवश्यक ती कागदपत्रे सहजच उपलब्ध होत असल्याचा फायदा कर्मचाऱ्यांना काम करताना होत आहे.
- माहिती अधिकाराच्या कक्षेत येणारे अनेक प्रश्न अद्ययावत रेकॉर्ड रूम आणि अभिलेखांच्या व्यवस्थापनामुळे सोडवण्यास मदत झाली.

## शैक्षणिक योजना

**प्रस्तावना :** शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा... या त्रिसूत्रीवर काम केल्यास प्रगती अटळ आहे, हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास झाल्याशिवाय अनुसूचित जातींचा सर्वांगीण विकास साध्य करणे शक्य नाही. त्यादृष्टीने पायाभूत विकासाबरोबरच या वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठीच्या विविध संधी उपलब्ध करून देणे, त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, शैक्षणिक प्रगतीसाठी विविध साधने, योजना आणि संकल्पना कार्यान्वित करून वंचितांची आणि मागासलेल्या वर्गातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीण प्रगती साधण्याचे ध्येय समाजकल्याण विभाग पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्नशील आहे. विविध शैक्षणिक योजना, आहे. शिष्यवृत्ती योजना आणि विशेष प्रोत्साहन योजना वंचितांच्या शिक्षणासाठी राबवल्या जात आहेत. फुलेवाडा शिक्षण योजना, समान संधी कार्यक्रम, स्वाधार योजना, भारत सरकार मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती शासकीय वसतिगृह, राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्तीच्या माध्यमातून परदेशी शिक्षणासाठी अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सोबतच देशांतर्गत शिष्यवृत्तीच्या माध्यमातून नामंकित संस्थामध्ये शिक्षणाच्या संधी, अशा विविध योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते.

**संकल्पना :** मागासलेल्या, वंचित समुदायाचे शिक्षणाच्या माध्यमातून सर्वंकष विकासाचे ध्येय घेऊन ते पूर्णत्वास घेऊन जाणे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजना पोहोचवणे. आधुनिक संकल्पना आणि तंत्रज्ञानाचा वापर योजनांच्या यशस्वितेसाठी करणे. सामाजिक समतोल राखत या संवर्गातील विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवणे, तसेच त्यांना स्पर्धात्मक परीक्षासाठी तयार करणे, शैक्षणिक आणि देशाचा सक्षम नागरिक म्हणून घडविणे ही संकल्पना आहे.

**उद्दीष्ट :** अनुसूचित जाती व वंचित समाजातील विद्यार्थ्यांना सामाजिक न्यायाच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी निर्माण करून देणे. त्याद्वारे त्यांच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन आणि चालना देणे. आधुनिक स्पर्धेच्या युगात इतर वर्गाप्रमाणेच या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे. भयमुक्त आणि खुल्या वातावरणामध्ये शिक्षण उपलब्ध करून देणे.

या समाजातील लोकांमध्ये शिक्षणाप्रती जागरूकता निर्माण करून त्यांना त्यांच्या हक्काची आणि अधिकाराची जाणीव निर्माण करून देणे. अनुसूचित जातीच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाची असलेली राज्यावरची जबाबदारी प्रामाणिकपणे सांभाळणे.

## शिक्षण फी व परिक्षा फी योजना

**योजनेचे नांव :** **शिक्षण फी व परिक्षा फी योजना**

**अटी-शर्ती :**

- **विदयार्थी हा अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा.**
- **विदयार्थ्याच्या पालकांचे विर्षिक उत्पन्न मर्यादा लागू नाही.**
- **विदयार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.**
- **या योजनेसाठी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरणे आवश्क आहे.**

**लाभाचे स्वरुप :** **शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणा-या अनु. जातीच्या विद्यार्थांना त्यांचे उत्पन्न विचारात न घेता सर्व मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यास क्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहीत केलेले शुल्क देण्यात येते.**

## शिक्षण फी व परिक्षा फी योजनेचा लाभ घेतलेल्या विद्‌यार्थ्याचे मनोगत



माझे नाव कु. अमर महेंद्र पवार, रा.ढोक्रवली, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथे राहत असून अनु.जाती प्रवर्गाचा असून मला समाज कल्याण विभामार्फत Master of Business Administration (MBA) करीता शैक्षणिक वर्ष 2019-20 ते 2020-21 चे दरम्यान शिष्यवृत्तीचा लाभ (**सन 2019-20 ते 2020-21 रक्कम रु.1.50 लक्ष**) मिळाल्याने मी माझे एम.बी.ए चे शिक्षण पुर्ण केले आहे. सदर बाबी मुळे मी आत्ता TCS (Tata Consultancy Services) कंपनीत Solution Configuration Expert या पदावर कार्यरत आहे. समाज कल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनेमुळे माझा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यास फार मदत झाली आहे. त्यामुळे मी समाज कल्याण विभागचा आभारी आहे.

**(कु.अमर महेंद्र पवार)**




माझे नाव कु. सौरभ संतोष जाधव, रा.करबुडे, ता. जि.रत्नागिरी येथे राहत असून अनु.जाती प्रवर्गाचा असून मला समाज कल्याण विभामार्फत Electronics And Telecommunication Engineefing (Degree) करीता शैक्षणिक वर्ष 2019-20 ते 2020-21 चे दरम्यान शिष्यवृत्तीचा लाभ (**सन 2019-20 ते 2020-21 रक्कम रु.1.67 लक्ष**) मिळाल्याने मी माझे डि.ग्री चे शिक्षण घेवू शकत आहे. समाज कल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनेमुळे माझा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यास फार मदत झाली आहे. त्यामुळे मी समाज कल्याण विभागचा आभारी आहे.

**(कु.सौरभ संतोष जाधव)**

## शिक्षण फी व परिक्षा फी योजना खर्च तपशिल

| अ. क्र. | सन | लाभार्थी संख्या | खर्च (रु.लाख) |
|---|---|---|---|
| 1 | 2019-20 | 875 | 576.58 |
| 2 | 2020-21 | 906 | 602.16 |
| 3 | 2021-22 | 797 | 274.03 |
| | एकूण : | **2578** | **1452.77** |



**परराज्यात शिक्षण घेत असलेल्या अनु.जाती विदयार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करणे**

**योजनेचे नांव :** **परराज्यात शिक्षण घेत असलेल्या अनु.जाती विदयार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करणे**

**अटी-शर्ती :** **विदयार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. वार्षिक उत्पन्न -2.5 लक्ष असावे**

**लाभाचे स्वरुप :** **संस्थेचे आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क**
**क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी रु. 10,000/-**

**परराज्यात शिक्षण घेत असलेल्या अनु.जाती विदयार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करणे**
**योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत**



माझे नाव डॉ. योगेश हरीश्चंद्र मंडपे मला समाज कल्याण विभागामार्फत Master Of Dental Surgeon (MDS) करीता शिष्यवृत्ती प्राप्त झाली **(सन 2018-19 ते 2020-21 रक्कम रु.2.30 लक्ष)** असल्यामुळे माझे मेडीकलचे शिक्षण पुर्ण झाले आहे. सदरबाबी मुळे आता मी खाजगी मेडीकल सराव करीत असून आर्थिकदृष्टया स्वावलंबी झालो आहे. माझ्या या यशामध्ये समाज कल्याण विभागाचा मोलाचा वाटा आहे व मी समाज कल्याण विभागाचा कायम आभारी आहे.

**(डॉ.योगेश हरीश्चंद्र मंडपे)**




माझे नाव अनिकेत भालचंद्र गायकवाड मला समाज कल्याण विभागामार्फत M.Tech (Food Technology) Lovely Professional University, Punjab येथे शिक्षण घेत असून माझे शिक्षणा करीता शिष्यवृत्ती प्राप्त झाली **(सन 2020-21 ते 2021-22 रक्कम रु. 3.1 लक्ष)** असल्यामुळे माझे शिक्षण सुरळीत चालू आहे. सदरबाबीमुळे मी आर्थिकदृष्टया स्वावलंबी झालो आहे. माझ्या या यशामध्ये समाज कल्याण विभागाचा मोलाचा वाटा आहे व मी समाज कल्याण विभागाचा कायम आभारी आहे.

**(अनिकेत भालचंद्र गायकवाड)**

## योजनेवरील खर्चाचा तपशील

| अ. क्र. | सन | लाभार्थी संख्या | खर्च (रु.लाख) |
|---|---|---|---|
| 1 | 2018-19 | 1 | 2.30 |
| 2 | 2019-20 | 0 | 0 |
| 3 | 2020-21 | 1 | 1.55 |
| 4 | 2021-22 | 1 | 1.55 |
| | एकूण : | **03** | **5.4** |



## छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना

**योजनेचे नांव :** छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना

**लाभाचे स्वरुप :** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्र.एबीसी-2003/प्र.क्र.15/मावक-2 दि.11 जून 2003 अन्वये छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार शिष्यवृत्ती ही योजना शाळेतून सर्वसामान्य विदयार्थ्यांतून इयत्ता 10 वी/12 वी मध्ये प्रथम येणाऱ्या अनुसूचित जाती, विजाभज तसेच विमाप्र प्रवर्गाच्या विदयार्थ्यास रक्कम स्वरुपात व प्रशस्तीपत्रक देवून सन्मानित करण्यात येते.

**फलनिष्पत्ती :** या योजनेअंतर्गत सन 2017 -18 ते सन 2021-22 या कालावधीत एकुण लाभ दिलेल्या विदयार्थ्यांची संख्या- 98

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत



कु. पुष्पल राकेश पवार, मी दहावी मध्ये विदयालयातून प्रथम क्रमांक प्राप्त करुन उत्तीर्ण झाल्याबद्दल मला राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेअंतर्गत पारितोषिक देण्यात आले. त्यामुळे मला पुढील शिक्षणासाठी आर्थिक हातभार लागला तसेच उच्च शिक्षण घेवून भविष्यात यशस्वी कारकीर्द घडविण्यासाठी प्रात्साहन मिळाले. माझ्यातील आत्मविश्वास द्विगुणित करण्यासाठी व पुढिल वाटचालीसाठी हातभार लावण्याकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे मनस्वी आभार

**(कु.पुष्पल राकेश पवार)**




कु. प्रेरणा रविंद्र सावंत, मी दहावी मध्ये विदयालयातून प्रथम क्रमांक प्राप्त करुन उत्तीर्ण झाल्याबद्दल मला राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेअंतर्गत पारितोषिक देण्यात आले. त्यामुळे मला पुढील शिक्षणासाठी आर्थिक हातभार लागला तसेच उच्च शिक्षण घेवून भविष्यात यशस्वी कारकीर्द घडविण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. माझ्यातील आत्मविश्वास द्विगुणित करण्यासाठी व पुढिल वाटचालीसाठी हातभार लावण्याकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे मनस्वी आभार

**(कु.प्रेरणा रविंद्र सावंत)**

**छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना वर्षनिहाय खर्चाचा तपशिल**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन | लाभार्थी संख्या | खर्च (रु.लाख) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2225-3262 | 2019-20 | 20 | 1.30 |
| 1 | | 2020-21 | 3 | 0.15 |
| 2 | | 2021-22 | 26 | 1.50 |
| | | एकूण : | 29 | 1.65 |



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

**योजनेचे नांव :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

**लाभाचे स्वरुप :** शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विदयार्थ्यांपैकी अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकातील इयत्ता 11 वी 12 वी तसेच इयत्ता 12 वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विदयार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विदयार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यामध्ये जमा करण्याकरता वरील शासन निर्णयामध्ये नमूद आहेत सदर योजेनकरीता पात्र ठरलेले विदयार्थी व योजनेचे दरवर्षीचे उद्दिष्ट पुर्ण करता यावे याकरीता योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करुन दिनांक 16.11.2017 चे शुध्दिपत्रक व दिनांक 02.12.2017 चे पुरकपत्र अधिक्रमित करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित केलेले आहे. दिनांक 13.06.2018 च्या शासन निर्णयामध्ये स्वाधार योजनेचा लाभ घेणे, शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/ शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या मागास वर्गीय विदयार्थ्यांकरीता स्वाधार योजना सुरु केलेली आहे.

**फलनिष्पत्ती :** सन 2017-18 ते 2021-22 या कालावधीत रत्नागिरी जिल्हयातील एकुण लाभ दिलेल्या विदयार्थ्यांची संख्या - 302 आहे.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत



कु. श्रध्दा राजेश लांजेवार महाविदयालय- गव्हमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, रत्नागिरी शैक्षणिक कोर्स- बी.फार्मसी. मी महाराष्ट्रतील अमरावती जिल्हयातील एका लहान खेडयातून एका आर्थिकदृष्टया कमकुवत कुटुंबातून असून बी.फार्मसी सारख्या अभ्यासक्रमासाठी गर्व्हमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, रत्नागिरी येथील महाविदयालयात प्रवेश मिळणे ही मोठी गोष्ट आहे. स्वाधार योजनेचा लाभ मिळाल्यामुळे मी यशस्वीपणे फार्मसी पूर्ण करु शकले तसेच करिअरच्या नाविन्यपूर्ण संधी मला मिळाल्या जेणेकरुन मी आत्मविश्वासाने माझे उज्वल भविष्य घडवू शकते. माझ्या शैक्षणिक कारकीर्दीच्या महत्वपूर्ण वळणावर मला आधार दिल्याबद्दल स्वाधार योजना व सामाजिक न्याय विभागाचे आभार.

**(कु.श्रध्दा राजेश लांजेवार)**



कु. सचिन बबन कांबळे महाविदयालय- श्रीमान भागोजीशेठ किर कॉलेज, रत्नागिरी शैक्षणिक कोर्स- लॉ कॉलेज. मी

महाराष्ट्रतील कोल्हापूर जिल्हयातील एका लहान खेडयातून एका आर्थिकदृष्टया कमकुवत कुटुंबातून असून लॉ सारख्या अभ्यासक्रमासाठी श्रीमान भागोजीशेठ किर लॉ कॉलेज, रत्नागिरी येथील महाविदयालयात प्रवेश मिळणे ही मोठी गोष्ट आहे. स्वाधार योजनेचा लाभ मिळाल्यामुळे मी यशस्वीपणे लॉ चे शिक्षण घेवू शकलो तसेच करिअरच्या नाविन्यपूर्ण संधी मला मिळाल्या जेणेकरुन मी आत्मविश्वासाने माझे उज्वल भविष्य घडवू शकतो. माझ्या शैक्षणिक कारकीर्दीच्या महत्वपूर्ण वळणावर मला आधार दिल्याबद्दल स्वाधार योजना व सामाजिक न्याय विभागाचे आभार.




**(कु.सचिन बबन कांबळे)**

कु. अमन विजय डबरासे, महाविदयालय- गर्व्हमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, रत्नागिरी. मी महाराष्ट्रतील नागपूर जिल्हयातील एका लहान खेडयातून एका आर्थिकदृष्टया कमकुवत कुटुंबातून असून इंजिनिअरींग सारख्या अभ्यासक्रमासाठी गर्व्हमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, रत्नागिरी येथील महाविदयालयात प्रवेश मिळणे ही मोठी गोष्ट आहे. स्वाधार योजनेचा लाभ मिळाल्यामुळे मी यशस्वीपणे इंजिनिअरींग करु शकलो तसेच करिअरच्या नाविन्यपूर्ण संधी मला मिळाल्या जेणेकरुन मी आत्मविश्वासाने माझे उज्वल भविष्य घडवू शकतो. माझ्या शैक्षणिक कारकीर्दीच्या महत्वपूर्ण वळणावर मला आधार दिल्याबद्दल स्वाधार योजना व सामाजिक न्याय विभागाचे आभार.

**(कु. अमन विजय डबरासे)**

**वर्षनिहाय खर्चाचा तपशिल**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन | लाभार्थी संख्या | खर्च (रु.लाख) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2225-E-777 | 2019-20 | 89 | 24.23 |
| 2 | | 2020-21 | 29 | 5.36 |
| 3 | | 2021-22 | 55 | 10.17 |
| | | **एकूण :** | **180** | **77.35** |


100
90
80
70
60
50
40
30
20
10
0
2019-20
2020-21
2021-22
लाभार्थी संख्या
खर्च (रु.लाख)

| मुंबई | मुंबई उपनगर | नवी मुंबई | ठाणे | रायगड | पालघर जिल्ह्यात एकाच वेळी वितरीत होणारे एकमेव दैनिक !

बितंबातमी!

मूल्य ३₹

# ३ लाख २२ हजार विद्यार्थ्यांसाठी ३६४ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती - आयुक्त डॉ प्रशांत नारनवरे

**अशोक गायकवाड**

मुंबई : समाज कल्याण विभागाच्या गतिमान प्रशासनामुळे राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील सन २०२१-२२ व २०२०-२१ मधील सुमारे ३ लाख २२ हजार विद्यार्थ्यांच्या सुमारे ३६४ कोटी रुपये शिष्यवृत्तीचा प्रश्न मार्गी लावण्यात यश आले आहे. राज्य शासनातर्फे सदर निधी विहित वेळेत मंजूर करण्यात आला आहे. सदर रक्कम लवकरच विद्यार्थांच्या खात्यात जमा होईल अशी माहिती समाज कल्याण विभाग महाराष्ट्र, पुणे चे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांनी दिली.

केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत केंद्र शासनाकडून देशातील विविध राज्यांना विविध योजनांना दिला जाणारा निधी हा त्या त्या राज्यांनी स्टेट नोडल एजन्सी (ड्छ) द्वारे वितरित करावे अश्या मार्गदर्शक सुचना दि २३-३-२०२१ रोजी केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडून निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणारी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे केंद्र हिस्सातील निश्चित केलेला ६० टक्के निधी डिबीटीच्या माध्यमातून केंद्र शासनाद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या खत्यात जमा करण्यात येत आहे. मात्र राज्य शासनाने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य हिस्साचा ४० टक्के निधी देखील देण्याकरितास्टेट नोडल एजन्सी (ड्छ)द्वारे वितरित करण्याच्या केंद्राच्या २३-३-२०२१ च्या सुचने प्रमाणे करणे बाबत राज्य शासनाच्या वित्त विभागाने मार्च २०२२ महिनाच्या सुमारे १५ तारखेच्या सुमारास आदेश निर्गमित केले होते.



चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यास केवळ एक आठवडा राहिला असतानाराज्य हिस्साच्या मंजुरी व सुधारित वितरणाबाबत वित्त विभागाने आक्षेप नोदविल्याने या बाबत मोठा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र समाज कल्याण आयुक्तालयाच्या सदर बाब निदर्शनास आल्याने समाज कल्याण आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांनी यासंबंधी तात्काळ पुढाकार घेऊन केंद्र शासनातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच केंद्र शासनातील वित्त विभागाशी चर्चा करून शिष्टाई केली.

वास्तविक, राज्याच्या वित्त विभागाने केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद करून देयके निर्गमित करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या इएचड प्रणालीवर आक्षेप निदर्शनास येत होते,याबाबत केंद्र शासनाकडुन सुधारित आदेश निर्गमित होणे आवश्यक असल्याचे राज्य शासनाच्या वित्त विभागाकडून सुचित करण्यात आले होते. त्याप्रमाणे समाज कल्याण आयुक्त, डॉ.प्रशांत नारनवरे यांनी समाज कल्याण आयुक्तालयाचे विशेष दूत नवी दिल्ली येथे पाठवून केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग व वित्त विभागाचे केंद्रीय सहसचिव व संबंधित यंत्रणाशी थेट संवाद साधून याबाबत सुधारित आदेश निर्गमित करण्याची विनंती केली होती, त्यानुसार केंद्र शासनाच्या वित्त विभागाने राज्यास दि.२९ मार्च २०२२ रोजी यासंबंधीच्या सूचना निर्गमित केल्याने राज्याच्या वित्त विभागाने त्यासंबंधी घेतलेले आक्षेप दूर केले. त्यामुळे राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील सन २०२१-२२ व २०२०-२१ मधील सुमारे ३ लाख २२ हजार विद्यार्थ्यांच्या सुमारे ३६४ कोटी रुपये शिष्यवृत्तीचा प्रश्न मार्गी लागला असून राज्य शासना तर्फे सदर निधी विहित वेळेत मंजूर करण्यात आला आहे.

समाज कल्याण विभागाने शेवटच्या टप्यात दाखवलेल्या सतर्कतेमुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील तीन लाखाहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न निकाली निघाला आहे. त्यामुळे समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून धन्यवाद व्यक्त केले जात आहे. अत्यंत कमी कालावधीत हा प्रश्न सोडवणे आवश्यक असल्याने समाजकल्याण विभागाचे अधिकारी यांनी देखील दिल्ली येथे जाऊन पाठपुरावा केल्याने हा प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली आहे. विभागाच्या सतर्कतेने व प्रसंगाअवधाने हा प्रश्न मार्गी निघाल्याने विभागाचे सर्वत्र अभिनदन होत आहे.

## समान संधी केंद्र उपक्रम (Equal Oppourtunity Center)

**प्रस्तावना :** शासनाची ध्येयधोरणे, योजना, कार्यक्रम इत्यादींचा समाजातील दुर्लक्षित घटकांना त्यांच्या व देशाच्या उन्नती करता उपयोग होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन, समुपदेशन, आर्थिक, सामाजिक आणि इतर बाबी संदर्भातील सहाय्य व विविधता महाविद्यालय परिसरातच उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदर बाबी या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Equal Opportunity Centre For Colleges XII 2012 या प्लॅनमध्येच नमूद आहे. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 46 अनुसार अनुसूचित जातीच्या कल्याणाची जबाबदारी राज्याची असल्याने व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे सदर घटकांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी होत असल्यामुळे महाविद्यालयामधील मागास प्रवर्गातील विद्यार्थी व इतर प्रवर्गातील विद्यार्थी यांना केंद्रबिंदू मानून विभागामार्फत राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्र स्थापन करण्याचा विचार डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संकल्पनेतून पुढे आला. राज्यामधील युवकांच्या ज्ञानाचा व मानवी संसाधनाचा विकासाकरिता उपयोग होण्याच्या दृष्टीने तसेच बदलत्या काळानुसार शैक्षणिक क्षेत्रामधील स्पर्धा लक्षात घेऊन संपन्न, समृद्ध व सक्षम नागरिक समाज घडविण्याकरता आणि सदर बाबींना चालना देण्याकरिता समानतेची संधी निर्माण होण्यासाठी समान संधी केंद्राची आवश्यकता आहे. या बाबींचा विचार करून तसेच राज्याच्या कल्याणकारी धोरणाची संकल्पना, मार्गदर्शक तत्वे इत्यादी बाबी विचारात घेऊन समान संधी केंद्राची महाविद्यालयामध्ये स्थापना करण्याचा निर्णय आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राज्यभरातील महाविद्यालयांना संबंधित जिल्ह्याच्या सहायक आयुक्त समाजकल्याण यांचेमार्फत निर्णय व सूचना निर्गमित केल्या. महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती / फ्रीशिप इत्यादी योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता, व्यवसाय, रोजगार निर्मितीसाठी-आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन - संवाद अभियान तसेच युवा संवाद कार्यक्रम सुरू करण्याकरिता, महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता Equal Opportunity Centre (समान संधी केंद्र) स्थापन करण्याचा फायदा होणार आहे.

**संकल्पना :** प्रत्येक महाविद्यालयात त्यांच्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व त्यांना सहाय्यक म्हणून किमान 12 विद्यार्थी यांची मदत घेऊन महाविद्यालयात Equal Opportunity Centre स्थापन करावेत व त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी, रोजगारप्राप्तीसाठी किंवा उद्योजक व व्यावसायिक होण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य शिक्षण या सर्व बाबींसह सर्वसमावेशक मार्गदर्शन करण्यात यावे. यासाठी सर्व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या जिल्ह्यातील सर्व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये तसेच इतर सर्व शैक्षणिक संस्था व त्यांच्या अधिपत्याखालील येणारे सर्व महाविद्यालयांमध्ये या स्वरूपाची केंद्रे तात्काळ चालू शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याबाबत सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांचे स्तरावरून लेखी निर्देश देण्याबाबत समाजकल्याण आयुक्तालय पुणे यांचेकडून वेळोवेळी निर्देशित करण्यात आले. तथापि, सद्यस्थितीतील कोविड - 19 महामारीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये नुकतीच प्रत्यक्षात चालू झाली असल्याने महाविद्यालयाने सदर Equal Opportunity Centre ची त्वरित स्थापना करून महाविद्यालय निहाय समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करून समाज, प्रसारमाध्यमांचा वापर करून अथवा Whatsapp ग्रुपचा उपयोग करून संबंधित महाविद्यालयात प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी समन्वय करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रमाणे प्रत्येक जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या व्ही. सी. द्वारे बैठका घेऊन उपरोक्त सर्व सूचना देण्यात याव्यात. याबाबत सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण व सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग यांना सूचना निर्गमित करण्यात आल्या.

**ठळक उद्दिष्टे :** महाडीबीटी प्रणालीवरील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व राज्य शासनाची शिक्षण शुल्क परीक्षा, शुल्क प्रतिपूर्ती योजनांचे अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व तदसंबंधी तक्रारींचे निवारण करून विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास सुलभता निर्माण करणे. समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती (Foreign Scholarship) तथा देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनाबाबत माहिती देणे. अनुसूचित जाती, महिला व इतर दुर्लक्षित घटक यांचेकरिता असलेल्या शासनाच्या धोरणांची आणि कार्यक्रमांची समाजातील गटांना लाभ मिळवून देण्याकरिता समाजकल्याण विभागाच्या सर्व योजनांची माहिती देणे, समुपदेशन करणे याकरिता सहाय्यक आयुक्त स्तरावर जिल्हा समितीची स्थापना करणे. दुर्लक्षित घटकांना मार्गदर्शन, सल्ला आणि शैक्षणिक करिअरच्या दृष्टीने माहिती देणे, आर्थिक, सामाजिक आणि इतर बाबी संदर्भातील विविधता महाविद्यालयीन परिसरामध्ये निर्माण करण्याकरता कृती करणे. समता आणि समान संधी समुदाय स्तरावर निर्माण होण्याकरिता सामाजिक समावेशनाबाबत (Social Inclusion) माहिती व मार्गदर्शनाची कार्यवाही व कामकाज करणे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, नुसार विद्यार्थ्यांमधील वैविध्यतापूर्ण गुणांच्या विकासाकरिता वाव निर्माण करणे तसेच शिक्षक आणि शिक्षकेत वर्गामध्ये शोषणाबद्दल असलेल्या पुर्वग्रहित दूषित संकल्पना संपुष्टात आणणे/नष्ट करणे. शैक्षणिक संवाद, आरोग्यदायी आंतरवैयक्तिक संबंधाची वाढ व सामाजिकदृष्ट्या अनुकूल वातावरण अशा विविध प्रकारच्या पार्श्वभूमीमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्राच्या माध्यमातून निर्माण करणे. दुर्लक्षित घटक व समाजातील घटकांकडून / विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करून सदर तक्रारीवर सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे / समस्या सोडविणे. दुर्लक्षित घटकांतील असलेले कल्याणकारी कार्यक्रम, सामाजिक कल्याणकारी योजना, अधिसूचना, सूचना, शासनाचे कार्यालयीन आदेश आणि इतर संबंधित संस्था/घटक यांच्याकडून याबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश याबाबतची माहिती देणे.

**उपक्रम :** **समान संधी केंद्र (Equal Oppourtunity Center)**

**स्वरुप :** **महाविदयालयातील मागसवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती/फ्रिशीप इ.योजना व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन सोबतच उदयोजकता, व्यवसाय, रोजगार निर्मितीसाठी - आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन संवाद अभियान तसेच युवा संवाद कार्यक्रम सुरु करण्याकरीता महाविदयालयांमध्ये विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "समान संधी केंद्र" स्थापन करण्यात येते.**

**फलनिष्पत्ती :** **रत्नागिरी जिल्हयामध्ये अधिनस्त एकुण 190 महाविदयालयांपैकी 110 महाविदयालयांमध्ये समानसंधी केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. समान संधी केंद्रामार्फत मागासवर्गीय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्याकरीता मार्गदर्शन करण्यात येते. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी समन्व साधून जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात विदयार्थ्यांना मागदर्शन करण्यात येते. समान संधी केंद्रमार्फत घेण्यात आलेल्या महाविदयालय निहाय उपक्रमांची संख्या 35 आहे. रत्नागिरी जिल्हयातील अधिनस्त महाविदयाल निहाय समान संधी केंद्रामार्फत लाभ मिळालेल्या विदयार्थ्यांची संख्या 1109 इतकी आहे.**

**आकडेवारी - रत्नागिरी जिल्हयातील अधिनस्त 190 महाविदयालयापैकी 110 महाविदयालयामध्ये समान**

**संधी केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे.**

# मागासवर्गीय मुलां/मुलींचे शासकीय वसतिगृहे योजना

**उपक्रम राबविण्याचा उद्देश:**

मागासवर्गीय मुलां-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

**योजनेचे स्वरुप :**

मागासवर्गीय मुलां-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

रत्नागिरी जिल्हयामध्ये मागासवर्गीय मुलां/मुलींची एकूण 10 वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहे. सदर वसतीगृहांमध्ये मुलींचे-04 वसतिगृहे (100 क्षमतेची-02 व 75 क्षमतेची-02 वसतिगृहे) व मुलांची -06 वसतिगृहे (100 क्षमतेची-02 व 75 क्षमतेची-04 वसतिगृहे) असे एकुण 850 विद्यार्थी शिक्षण घेवू शकतील अशी वसतीगृहे कार्यरत आहेत.

**लाभाचे स्वरूप :**

1. मोफत निवास व भोजन, अंथरून पांघरूण, ग्रथालयीन सुविधा
2. शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य
3. क्रमिक पाठयपुस्तेके वहया स्टेशनरी करीता आर्थिक सहाय्य
4. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, डॉईग बोर्ड,बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांनसाठी रंग, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश, कूनव्हास इत्यादी
5. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी दरमहा निर्वाहभत्ता दिल्या जातो. (जिल्हास्तर - रु.600/- व तालुकास्तर-रु.500/- (मुलींसाठी स्वच्छता प्रसाधनाकरीता जादाची रू.100/-)

**कार्यरत शासकीय वसतिगृहे :**

रत्नागिरी जिल्हयातील खालील मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहांमध्ये सन 2022-23 मध्ये एकुण- 389 विदयार्थी व विदयार्थीनी निवासी राहून शालेय, कनिष्ठ महाविदयालयीन, वरिष्ठ महाविदयालयीन तसेच व्यावसायिक महाविदयालयात शिक्षण घेत आहेत.

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, मंडणगड
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, चिपळूण
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, देवरुख
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, जेलरोड, रत्नागिरी
5. मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, जेलरोड, रत्नागिरी
6. मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, चिपळूण
7. 100 मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कुवारबांव
8. 100 मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, रायपाटण
9. 100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सावर्डे
10. नवीन 100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, टीआरपी, रत्नागिरी



100 मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी



100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, टि.आर.पी., रत्नागिरी



मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, चिपळूण



मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, मंडणगड



100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सावर्डे, ता.चिपळूण



मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, जेलरोड, रत्नागिरी

## शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे मनोगत



मी कु.स्नेहल रुपेश तुरळकर, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, जेलरोड, रत्नागिरी येथे प्रवेशित आहे. मी या वस्तीगृहामध्ये सहा महिन्यांपूर्वी दाखल झाले आहे. या वस्तीगृहात येण्यापूर्वी मी भाड्याने खोली घेऊन राहत होते. तिथे माझा आर्थिक खर्च जास्त येऊ लागला. मला या वस्तीगृहाची माहिती मिळाली. त्यामुळे मी या वस्तीगृहात येऊ शकले. मी या वस्तीगृहात येण्यापूर्वी माझ्या मनात अनेक शंका-कुशंका निर्माण झाल्या होत्या. त्याचे समर्थन व निरसन प्रत्यक्षात मला इथे येऊन झाले.

आपल्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा हा एक शिकण्याचा अनुभव असतो. जेव्हा मी या वस्तीगृहात प्रत्यक्षात आले तेव्हा मला याची जाणीव झाली. मी जेव्हा रत्नागिरीत व्यावसायिक शिक्षण घेण्याकरिता (DT.Ed) आले. वस्तीगृहात आल्यानंतर शैक्षणिक साहित्यासाठी निधी उपलब्ध झाला. तसेच निर्वाह भत्ता दरमहा सातशे रुपये मात्र याप्रमाणे मिळतो. आमच्या भोजनासाठी स्वतंत्र स्वयंपाक गृह उपलब्ध आहे. आमच्या मागणीनुसार दैनंदिन आहार पुरवला जातो. वस्तीगृहातून पावसाळ्यात रेनकोट, छत्री बूट यासाठी वेगळा निधी पुरविला जातो. शैक्षणिक वर्षामध्ये जाणाऱ्या शैक्षणिक सहलीसाठी आम्हा सर्वांना वस्तीगृहातून दोन हजार रुपये इतका निधी पुरविला जातो. संगणकीय ज्ञान अवगत होण्याकरिता आम्हा सर्वांसाठी संगणक कक्ष उपलब्ध करून दिले आहेत तसेच आम्हाला वाचनालय उपलब्ध करून दिले. त्यामुळे मला शासनाचा आर्थिक व शैक्षणिक आधार मिळाला त्याबद्दल मी शासनाचे आभार मानते.

## वसतीगृह व्यवस्थापनासाठी आदर्श गृहपाल यांची निवड करून त्यांचा सत्कार

रत्नागिरी जिल्हयात 10 वसतीगृहे सुरू आहेत. सदर 10 वसतीगृहांमध्ये 4 वसतीगृहे आहेत. सदर 10 वसतिगृहांचे व्यवस्थापन सांभाळणेसाठी जिल्हयात 5 गृहपाल कार्यरत आहेत त्यापैकी महिला गृहपाल एकच कार्यरत आहेत त्यामुळे वसतीगृहाचे श्रीमती अनघा अशोक भोसले (नवीन 100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, टी.आर.पी रत्नागीरी) या वसतीगृहाचा नियमित कार्यभार व इतर 3 वसतीगृहाचा अतिरिक्त सोपविण्यात आलेला आहे. या चार वसतीगृहावरील वर्ग 3 व वर्ग 4 ची पदे रिक्त असुन देखील श्रीमती अनघा अशोक भोसले , गृहपाल हया वसतिगृहांच्या मुलींची कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवून न देता वसतिगृहाचे व्यवस्थापन उत्कृष्ठप्रकारे सांभाळले आहे.

त्यानुषंगाने या कार्यालयाकडून रत्नागिरी जिल्हयातील उत्कृष्ठ गृहपाल निवडीसाठी श्रीमती अनघा अशोक भोसले ( गृहपाल, नवीन 100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, टी.आर.पी. रत्नागीरी) यांची शिफारस करण्यात आलेली होती. त्यानुसार मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, मुबई यांचेकडून त्यांचा शाल व स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आहे. तसेच मा. आयुक्त महोदय, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे हस्ते शाल आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र हे पुस्तक देवून गौरविण्यात आले.







**उत्कृष्ठ गृहपाल म्हणून सत्कार स्विकारतांना श्रीम.अनघा अशोक भोसले,**
**गृहपाल, नवीन 100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, टी.आर.पी. रत्नागीरी**

**श्रीम.अनघा अशोक भोसले, गृहपाल यांचे मनोगत :**

सर्वप्रथम मला हा आदर्श गृहपाल पुरस्कार देऊन मला सन्मानित केले त्याबद्दल आपले मन.पूर्वक आभार. ज्या लोकसमुहात आपण काम करतो ज्यांना या कामाची प्रणालीची पूर्ण माहिती आहे त्याचे महत्त्व माहिती आहे त्यांचेकडून पुरस्कार मिळाला याच महत्त्व जास्त आहे. आपल्या माणसांकडून पुरस्कार मिळणे पाठीवर कौतुकाची शाबासकीची थाप पडणे खूप आनंददायी असते तो आनंद आपण मला दिलात आपले शतशः आभार .

सन 1993 मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात गृहपाल म्हणून कामाला सुरुवात केली आज नोकरीला 29 वर्षे झाली असून अनेक विद्यार्थीनींना शासकीय वसतिगृहात प्रवेश देवून त्यांना योग्य मार्गदर्शन देवून स्वयंपूर्ण बनविण्याचा प्रयत्न केला व ती आपली जबाबदारी आपल्यावर आहे याचे भान ठेवून काम केले व त्याची फलनिष्पत्ती म्हणून हा पुरस्कार याचा मला आनंद आहे. आधुनिक स्पर्धेच्या काळाला सामोरं जाणारा सशक्त बुद्धिमान तेजस्वी असा विद्यार्थी घडवूया म्हणजे आपल्यालाही काम केल्याचे समाधान मिळेल व जीवनात काहीही कमी पडणार नाही.

## शासकीय वसतिगृहामध्ये - वाचन प्रेरणा उपक्रम

**उपक्रम राबविण्याचा उद्देश**:

सदर उपक्रम राबविण्यामागे विदयार्थ्यांची वाचनाविषयी गोडी निर्माण होवून वाचनातून वैचारीकतेत वृध्दी होणे तसेच विदयार्थ्यांचा सामाजिक व शैक्षणिक तसेच आर्थिक असा सर्वांगिण विकास होणे हा आहे.

**उपक्रम राबविण्यापुर्वीची परिस्थीती**:

सदर उपक्रम राबविण्यापुर्वी वसतिगृहातील विदयार्थी व विदयार्थीनी ग्रंथालयातील पुस्तकांचा वापर कमी करत होते व त्यांच्या अभ्यासक्रमाचे पुस्तक वाचन करण्याकडे त्यांचा मोठया प्रमाणात कल होता. अवांतर वाचनाकडे विदयार्थ्यांची गोडी दिसून येत नव्हती.

**उपक्रम राबविण्यादरम्यानची प्रगती**:

सदर उपक्रम रत्नागिरी जिल्हयातील सर्व मागासवर्गीय मुलां/मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये राबविण्यात आलेला आहे. सदर उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनासंबंधीचे महत्व कळाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनासंबंधील खालील प्रमाणे चांगल्या प्रकारे दृष्टीकोनात सकारात्मक बदल झालेला आढळून आला :

- अवांतर वाचनाची गोडी निर्माण झाली
- ज्ञानात सखोलता निर्मान होत आहे.
- ग्रथालयाचा चांगला प्रकारे वापर होत आहे.
- विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे.
- वाचन प्रेरणा उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये पायाभूत स्पर्धा परिक्षेची तयारी होत आहे.
- विद्यार्थ्यांचे चांगल्या प्रकारे विरंगूळा व मनोरंजन झाले.

**उपक्रम राबविण्यानंतरची वस्तुस्थिती**:

सदर उपक्रम रत्नागिरी जिल्हयातील सर्व मागासवर्गीय मुलां/मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये राबविण्यात आलेला आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये सदर उपक्रम अजुनही राबविला जात आहे. सदर उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनासंबंधीचे महत्व कळाले. त्यामुळे वसतीगृहांमध्ये विदयार्थी व विदयार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पुस्तकांबरोबरच अभ्यासक्रमातील संदर्भिय ग्रंथालयातील पुस्तकांचा तसेच वर्तमानपत्रकाचे वाचन करत असल्याचे दिसून आले.

**फलनिष्पती** :

सदर उपक्रमामुळे विदयार्थ्यांमध्ये स्पर्धा परिक्षेला तोंड देण्यासाठी पायाभूत तयारी होत आहे तसेच विदयार्थ्यांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्यामध्ये उतुंग यश संपादन करण्याची तयारी होत आहे. तसेच विदयार्थ्यांमध्ये दैनंदिन जिवनामध्ये येणाऱ्या अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याची जिद्द निर्माण झालेली दिसून येत आहे.त्यांचा सर्वांगिण विकास होत असल्याचे आढळून आले.

## :: विद्यार्थ्यांचे वाचना संबधी मनोगत ::

**कु.कशिष विलास जाधव,**
**मुलींचे शासकीय वसतीगृह, जेलरोड, रत्नागिरी**



माझ्या वसतीगृहात गृहपाल श्रीमती ए.ए.भोसले मॅडम यांनी वाचन प्रेरणा उपक्रम राबवित आहेत. त्यामुध्ये आम्ही प्रार्थनेच्या वेळी ठळक बातम्याचे वाचन व यशाची परिक्रमाची व चानाक्य मंडळ यांतील सर्वसामान्य ज्ञानावरील दररोज 10 प्रश्न यांचे वाचन घेत असतात त्यामुळे आमच्या सर्वसामान्य ज्ञानात वृध्दी होत आहे. तसेच ग्रंथालयीन अनेक पुस्तके वाचनासाठी उपलब्ध होत असल्यामुळे आमच्यामध्ये वाचनाची गोडी निर्माण होत आहे. व आमच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक अवांतर वाचन करित आहोत. व स्पर्धा परिक्षेची पायाभूत तयारी होत आहे. यांचा फायदा आमचे भविष्य घडविण्यात होईल.

**(कु.कशिष जाधव)**

## :: विद्यार्थ्यांचे वाचना संबधी मनोगत ::

**कु.सोहन राठोड,**
**100 मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कुवारबांव,**
**ता.जि.रत्नागिरी**



मी, सोहन राठोड, बी.ए.-2 मध्ये शिकत असून वाचन प्रेरणा उपक्रमामुळे माझ्यात वाचनाबद्दल आवड निर्माण झाली. अवांतर वाचनामुळे माझ्या ज्ञानामध्ये भर पडली. तसेच स्पर्धापरिक्षांना तोंड देण्यासाठी माझी पायाभूत तयार होत आहे. तसेच वाचनासाठी विविध पुस्तके उपलब्ध होत आहेत.

**(सोहन राठोड)**

# शासकीय वसतिगृहामध्ये - संवाद उपक्रम

**उपक्रम राबविण्याचा उद्देश**:

सदर उपक्रम राबविण्यामागे मागासवर्गीय मुला-मुलींचे शासकीय वसतीगृहातील विदयार्थ्यांशी शासकीय वसतीगृहातील मिळणाऱ्या लाभाची योग्य अंमलबजावणी होत आहे का यासाठी अधिकारी व कर्मचारी यांचा विदयार्थ्यांशी प्रत्यक्ष व थेट संवाद साधून त्यांच्या अडअडचणी समजून घेवून त्याचे निराकरण करणे.

**उपक्रम राबविण्यापुर्वीची परिस्थीती**:

सदर उपक्रम राबविण्यापुर्वी मागासवर्गीय शासकीय वसतीगृहातील विदयार्थ्यांचा अधिकारी व कर्मचारी यांच्याशी कमी प्रमाणात थेट व संपर्क व संवाद साधला जात होता त्यामुळे विदयार्थ्यांच्या अडीअडचणी निराकरण करणेसाठी विलंब होत होता व विदयार्थी व अधिकारी यांच्यामध्ये थेट संवाद होत नसल्यामुळे विदयार्थ्यांच्या अडचणी कार्यालयापर्यंत पोहोचण्यास विलंब होत होता.

**उपक्रम राबविण्यादरम्यानची प्रगती**:

मा.आयुक्त महोदय यांच्या निर्देशानूसार सदर उपक्रम राबविल्यामुळे मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहातील विदयार्थी संवाद कार्यक्रमाअंतर्गत थेट व प्रत्यक्ष त्यांना मिळणाऱ्या लाभासंदर्भात व अडीअडचणी संदर्भात संवाद साधत आहेत. त्यामुळे विदयार्थ्यांच्या समस्येचे तात्काळ निराकरण करण्यात येत आहे व विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित साधले जात आहे.

**उपक्रम राबविल्यानंतरची वस्तुस्थिती**:

सदर उपक्रमाअंतर्गत कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतीगृहास भेट देवून निवासी राहून त्यांना वसतीगृहात निवास करताना येणाऱ्या अडचणीचा स्वत:अनुभव घेवून त्याचे निराकरण करत आहोत. सदर उपक्रमामुळे वसतीगृहातील विदयार्थ्यांशी जास्तीत जास्त संवाद साधून त्यांच्या प्रत्येक अडचणीचे निराकरण करण्यात येत आहे.

**फलनिष्पत्ती** :

सदर उपक्रम रत्नागिरी जिल्हयातील सर्व मागासवर्गीय मुलां/मुलींचे शासकीय वसतिगृहांमध्ये राबविण्यात आलेला आहे. सदर उपक्रम राबविल्याण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, रत्नागिरी येथील अधिकारी व कर्मचारी यांनी मागासवर्गीय मुलां/मुलींच्या शासकीय वसतीगृहास प्रत्यक्ष भेटी दिलेल्या आहेत. त्यामुळे वसतिगृहात प्रवेशित असलेल्या मुलां/मुलींच्या अडी-अडचणी समक्ष समजून त्यांच्या अडी-अडचणींचे निराकरण करणे सोईचे झाले.

## शासकीय वसतिगृहामध्ये - संवाद उपक्रमांतर्गत
## संवाद साधतांना श्री.यादव गायकवाड, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,रत्नागिरी



मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, देवरुख, जि.रत्नागिरी



100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सावर्डे, ता.चिपळूण




100 मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी



नवीन 100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, टि.आर.पी., रत्नागिरी

## आदर्श शासकीय वसतिगृह

मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचे अध्यक्षतेखाली दि.13.09.2022 रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार रत्नागिरी जिल्हयातील आदर्श शासकीय वसतिगृह निवड करण्यासाठी तपासणी सुची या कार्यालयाचे पत्र क्र.2312, दि.16.09.2022 अन्वये शासकीय वसतिगृहांना कळविण्यात आली आहे.

**आदर्श वसतीगृह निवडीसाठीची तपासणी सुची :**

१. वसतिगृहाची व परिसराची व स्वयंपाक घराची स्वच्छता,
२. वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थी संख्या,
३. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता,
४. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची स्वयंशिस्त व त्याच्या रुमची वैयक्तीक ठेवण,
५. वसतिगृहातील विविध समित्यांची स्थापना व त्यांच्या नियमिती बैठका,
६. वसतीगृहातील अभ्यासिका व ग्रंथाल,
७. अभिलेखे अद्यावतीकरण,
८. कर्मचा-यांचे सेवाभिलेख अद्यावतीकरण व सेवाविषयक लाभ,
९. प्रवेशित विद्यार्थ्यांचे दैनंदिन वेळाचे नियोजन (सकाळी उठल्यापासुन रात्री झोपेपर्यंतचे आढवडयाचे नियोजन,
१०.वसतिगृहाचे सुशोभिकरण,
११. तक्रार पेटी व तक्रारीचे निवारण,
१२. वसतिगृहातील व वसतिगृहाच्या परिसरातील कच-यांचे नियोजन व विल्हेवाट,
१३. गृहपाल विद्यार्थी-पालक यांचे संबंध,
१४. वसतीगृहात राबविले जाणारे उपक्रम,
१५. वसतीगृहत प्रवेशित विद्यार्थी विशेष प्रविण्य प्राप्त विद्यार्थी (स्पर्धा परिक्षा इत्यादी क्रिडा, सामाजिक शैक्षणिक),
१६. पालक मेळावे,
१७. मुलीच्या वसतिगृहामध्ये मुलीच्या सुरक्षेसाठी समिती अशा प्रकारे तपासणी सुची देण्यात आलेली आहे. तपासणी सुची नुसार तपासणी करुन आदर्श वसतिगृह निवडण्याची कार्यवाही सुरू आहे.



100 मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी



100 मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सावर्डे, ता.चिपळूण

सच आयेगा सामने...
# सत्य महाराष्ट्र
संपादक - अनिल गायकवाड
संपर्क :- 9766993609
8329122718
satyamaharashtra756@gmail.com
satyamaharashtra
SOCIAL MEDIA EDITION
मंगळवार, दि.२ ऑगस्ट २०२२

# समाज कल्याण आयुक्त यांचे निवासी शाळेत मुक्काम

## ❒ राज्यात राबविला संवाद उपक्रम ❒ विद्यार्थ्यांकडून उपक्रमाचे कौतुक





**सत्य महाराष्ट्र जिल्हा प्रतिनिधी**

**अमरावतीः** राज्याच्या समाज कल्याण विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय वसतीगृह च्या सोयी सुविधांबाबत विद्यार्थ्याकडून काही तक्रारी तसेच प्रश्न उपस्थित केले जातात, याला पाहता त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी समाज कल्याण आयुक्त डॉ प्रशांत नारनवरे यांनी संवाद कार्यक्रम हा अभिनव उपक्रम राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

संवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील सर्व अधिकारी यांनी मागील दि २८ जुलै रोजी वस्तीगृह येथे भेटी देत रात्रभर मुक्कामी राहून विद्यार्थ्यांच्या समस्या तसेच तक्रारी ऐकल्या आणि त्यांना निवारण करण्यासाठी पुढाकार सुद्धा घेतला.

अमरावती विभागा अंतर्गत अमरावती जिल्हयातील २४ वसतीगृह व ७ शासकिय निवासी शाळा, अकोला जिल्हयातील ८ वसतीगृह व ४ शासकिय निवासी शाळा, बुलढाणा जिल्हयातील १७ वसतीगृह व ५ शासकिय निवासी शाळा तसेच वाशिम जिल्हयातील ६ वसतीगृह व ३ शासकिय निवासी शाळा, अश्या चार जिल्हयांतील ५५ शासकीय वसतीगृह व १९ अनसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळांमध्ये विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी रात्रभर मुक्काम करुन विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला आहे.

या उपक्रमाचे विद्यार्थ्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आले असून राज्यात प्रथमच अशा प्रकारचा अनोखा उपक्रम यावर्षी राबविला जात असल्याचे विद्यार्थ्यांनी कौतुक केले आहे.

विभाग प्रमुखांचा वसतीगृहात रात्रभर मुक्काम हा विद्यार्थ्यांसाठी कुतुहलाचा विषय होता. या संवाद उपक्रमामुळे शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना देखील सुखद अनुभवाचा धक्का बसला.

यवतमाळ जिल्हयात सदर उपक्रमाअंतर्गत दि. २९. जुलै रोजी १८ शासकिय वसतीगृह व ७ अनसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळांमध्ये संवाद उपक्रम राबविण्यात आला.

आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी देखील पुणे येथील वसतिगृहात रात्रभर मुक्काम करुन स्वतः विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधत त्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा जेवण व विद्यार्थ्यां कडून राबविण्यात येणारे विविध उपक्रमाविषयी माहिती जाणून घेतली.

अमरावती समाज कल्याण विभागातील प्रादेशिक उपायुक्त, , सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी व इतर कर्मचारी यांनी त्या त्या जिल्ह्यांत शासकीय वसतिगृह व शासकीय निवासी शाळांमध्ये मुक्काम केला आहे.

संवाद उपक्रमांतर्गत प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे यांनी एक हजार मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह निंभोरा, अमरावती येथील वसतिगृहात मुक्काम करून विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला तसेच त्यांच्या विविध समस्या संदर्भात माहिती जाणून घेतली त्याच प्रकारे त्यांच्या निराकारणासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन देऊन त्यांना आवश्यक माहिती पूर्वक मार्गदर्शन केले.

सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी गट (ब), लेखाधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी व कार्यालयातील इतर कर्मचारी यांनी देखिल शासकिय वसतिगृह व शासकिय निवासी शाळांमध्ये मुक्काम केला. विद्यार्थ्यांसोबत संध्याकाळ पासून ते सकाळ पर्यंत राहून त्यांच्या नित्यक्रमानुसार खेळ, व्यायाम, अभ्यासाच्या वेळीचे निरीक्षण यासह संवाद साधुन विद्यार्थी व व्यवस्थापना मध्ये खेळीमेळी चे वातावरणात निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत जेवण देखील केले.

समाज कल्याण आयुक्त यांच्या संवाद कार्यक्रम संकल्पनेने विद्यार्थी देखील भारावून गेले.

यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक विषयावर अधिकाऱ्यांसोबत मनमोकळ्या गप्पा सुद्धा केल्या.

यावेळी अधिकाऱ्यांनी वसतिगृह गृहप्रमुख व गृहपाल यांना वसतीगृहात निवास करणे बाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सूचना व मागणीनुसार त्यांना योग्य त्या सुविधा पुरविण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी कौशल्य विकास कार्यक्रम तसेच विविध तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजित करणे बाबत आयुक्त यांच्या वतीने निर्देश देण्यात आले आहेत.

विविध नाविण्यपूर्ण उपक्रम या पुढे ही राबविण्यात येतील असे सुनिल वारे, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांनी कळविले आहे.

## राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथी हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबत

**योजनेचे नांव :** राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उददेशाने तृतीयपंथी हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबत.

**योजनेचे स्वरुप :** तृतीय पंथी नागरिक हा समाजातील एक दूर्लक्षित घटक असलेमुळे समाजाकडून त्यांचे संदर्भात घटनेतील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे समाजाकडून अंमलबजाणी होत नसलेमुळे, शासनाकडून त्यांचे मूलभूत अधिकांरांचे संरक्षण करून त्यांना सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे समान संधी उपलब्ध करून देणेसाठी राज्यातील तृतीयंपंथी नागरीकांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याच्या उददेशाने राज्य स्तरावर व विभागीय स्तरावर राज्यातील तृतीयंपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थाप करण्यास 13.डिसेंबर 2018 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने रत्नागिरी जिल्हात मा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीयांच्या समस्या/तक्रारी संदर्भात जलदगतीने प्रभावी नियंत्रण व निवारण करणेसाठी समिती गठित करणेत आली आहे. सदर समितीची बैठक दर तीन महिन्यांनी आयोजित करून रत्नागिरी जिल्हातील तृतीयपंथीयांच्या समस्या/तक्रारी संदर्भात जलदगतीने निवारण करण्यात येते.

**फलनिष्पत्ती :**

1. तृतीय पंथीय व्यक्तींची रोजगारा संदर्भात समस्या लक्षात घेता त्यांच्या कल्याणा साठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करणेसाठी तृतीय पंथीयांचे कल्याण मंडळाची स्थापना (कार्यक्रम) (2232-सी199-31-वेतनेत्तर लेखाशिर्षांतर्गत या कार्यालयास रक्कम रु.4.00 लक्ष (अक्षरी चार लक्ष) प्राप्त झालेले आहेत. सदर निधी रत्नागिरी जिल्हयातील केंद्र शासनाच्या https://transgender.dosje.gov.in या अधिकृत पोर्टलद्वारे नोंदणी केलेल्या व त्यांना प्रमाणपत्र व ओळखपत्र प्राप्त झाले आहे अशा तृतीय पंथी नागरीकास व्यवसाय करणेसाठी दि.07.11.2022 रोजी मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेमध्ये तृतीय पंथीय नागरीकांना व्यवसाय करणेसाठी आर्थिक सहाय्य देणेचे मंजूर करणेत आले.
2. या कार्यालयाकडून दि.26.08.2022 रोजी तृतीय पंथी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आणि त्यांचे दैनंदिन जिवन जगत असतांना त्यांच्या अडी-अडचणी समजून घेऊन त्याचे निराकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, रत्नागिरी येथे**
**तृतीय पंथीयांच्या समस्येबाबत घेण्यात आलेली बैठक**

## तृतीयपंथी व्यक्तीचे मनोगत



माझे नांव पल्लवी शर्मीला माने, रा. क्रांती नगर झोपडपट्टी, स्टेटबँक कॉलनीजवळ, रत्नागिरी येथे राहत आहे. मी एक तृतीयपंथी नागरीक असून समाजापासून दुर्लक्षीत आहे. समाज कल्याण विभागाने मला केंद्र शासनाच्या तृतीयपंथीयांसाठी असलेल्या पोर्टलवरील प्रमाणपत्र व ओळखपत्र उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे मला शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणे सोईस्कर झाले आहे. तसेच समाज कल्याण विभागाने मला व्यवसाय करणेसाठी आर्थिक देण्याबाबत मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे मी माझा स्वत:चा व्यवसाय करून स्वाभिमानाने जिवन जगू शकेल व माझा निर्वाह करू शकेल. त्याबद्दल शासनाचे आभार व्यक्त करते.

## जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय व संनियंत्रण समिती

**योजनेचे स्वरुप :** आई -वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम 2010 दिनांक 23.06.2010 च्या अधिसूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर नियम 2010 मधील नियम 22 नुसार जिल्हास्तरावर अधिनियमांच्या प्रभावी तथा समन्वित अंमलबजावणीसाठी आणि सल्ला देण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय व संनियत्रण समिती स्थापना करण्याबाबत तरतूद आहे. त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन निर्णय क्र.डी.डि.पी.2019/प्र.क्र. 311/सामासु मंत्रालय मुंबई दिनांक 31.10.2022 अन्वये रत्नागिरी जिल्हात मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेतेखाली जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय व संनियत्रण समिती स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दर तीन महिन्यात आयोजित करून जेष्ठ नागरिक यांचे अडी - अडचणी व मागण्यांचे निराकरण करणेत येते.

**फलनिष्पती :** जिल्हयातील जेष्ठ नारिकांची जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय व संनियत्रण समिती बैठक दिनांक 07.11.2022 रोजी मा.जिल्हाधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली संप्पन्न झाली त्यामध्ये जेष्ठ नागरिकाच्या मागणीनुसार खालीलप्रमाणे संबंधित शासकीय प्राधिकरणास अंमलबजावणी करण्याचे सूचित केलेले आहे.

1. पोलिस अधिक्षक कार्यालयास प्रत्येक पोलिस ठाण्यातील कार्यक्षेत्राच्या हदीत स्वतंत्रणपणे राहात असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची अद्यायावत यादी ठेवणे व पोलीस ठाण्याच्या प्रतिनिधीने अशा ज्येष्ठ नागरिकाना नियमित त्यांचे घराजवळून फेरी मारणे मदतीची मागणी केल्यास तात्काळ मदत करण्याच्या सूचमा मा. अध्यक्ष महोदयांनी केल्या.
2. ज्येष्ठ नागरीकांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी त्यांची कार्यशाळा व तपासणी शिबीर यांचे आयोजन करण्याचे अध्यक्ष महोदयांनी सूचना.
3. ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या शासनाच्या सर्व योजना व सोई -सुविधा पात्र ज्येष्ठ नागरिकांसाठी मिळणेसाठी सर्व प्राधिकरणांनी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत अशा सूचना मा.जिल्हाधिकारी महोदय, रत्नागिरी यांनी दि.07.11.2022 रोजी झालेल्या ज्येष्ठ नागरीक समन्वय व संनियत्रण समितीमध्ये केल्या.
4. जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय रत्नागिरी, यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांकडून शहारामध्ये उताराच्या रस्त्यावर रंबल स्ट्रीप घालावेत.जिल्हा परिषद कार्यालय,शिवाजीनगर बस स्टॉप नजिकचा रस्ता दुभाजक,शहराच्या वेशी वरील साळवी स्टॉप येथे रंबल स्ट्रीपची घालावेत.
5. ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार समाज कल्याण कार्यालया तर्फे ज्येष्ठ नागरिक कक्ष मा. जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी येथे स्थापन करून सदर कार्यालयात मा. जिल्हाधिकारी महोदय, यांचे कार्यालयातील 1 कर्मचारी दिवसात दोन ते तीन तास उपस्थित ठेवणेबाबत निवासी जिल्हाधिकारी यांना कळवावे.
6. जिल्हयामध्ये ज्येष्ठ नागरीकांच्या आरोग्याची तपासणी करणेसाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणारे वृध्दाश्रम तसेच खाजगी वृध्दाश्रमात आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले होते.

अशा प्रकारे जेष्ठ नागरिकांच्या कल्याणा साठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची कार्यवाही चालू आहे.



(ज्येष्ठ नागरीक शिबीर)



(ज्येष्ठ नागरीक आरोग्य शिबीर)

## रमाई आवास योजना (शहरी)


**लाभार्थी मनोगत :**

**श्री. दिपक धोंडिराम लोकरे मु पो. लांजा ता. लांजा जिल्हा रत्नागिरी,**
**व्यवसाय - घडयाळ दुरुस्ती**

मी श्री दिपक धोंडिराम लोकरे मु पो. लांजा ता. लांजा जिल्हा रत्नागिरी या ठिकाणचा रहिवाशी असून कोकण सारख्या अतिपावसाच्या ठिकाणी राहतो. माझा हा व्यवसाय आहे.

घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे नविन घर बांधणे शक्य नव्हते त्यामुळे मी जुन्या कच्च्या घरात राहत होतो. घर दुरूस्त करण्याचा विचार करत असताना, या दरम्यान मला महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत अनसुचित जाती व नवबौध्द प्रवर्गासाठी असलेल्या रमाई आवास योजनेची माहिती मिळाली, या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहायक आयुक्त समाजकल्याण रत्नागिरी या ठिकाणी जाऊन अर्ज केला व आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता केली.

सन 2018-19 मध्ये मला घरकूल योजनेचा लाभ मंजूर केल्याचे कळविण्यात आले. त्यानंतर मला नगरपंचायत यांचे मार्फत रक्कम रु. 2,50,000/- इतकी लाभाची रक्कम मिळाली. घरकुलचे बांधकाम सुरू केले असून सद्यस्थितीत घराचे बांधकाम पुर्ण झाले असून नविन घरी वास्तव्यास गेलो आहे, शासनाच्या या योजनेमुळे माझा निवाराचा प्रश्न मिटला व स्वत:चे घर बांधू शकलो त्याबददल शासनाचा मी मनापासून आभारी आहे.



## अनु.जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम-1989 (ॲट्रोसिटी ॲक्ट)

**अनु.जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक 1989 (ॲट्रोसिटी ॲक्ट) अंतर्गत**
**अत्याचार पिडीत व्यक्तींना अर्थसहाय्य करणेच्या योजनेअंतर्गत**
**अत्याचार पिडीत व्यक्तीचे मनोगत**

**डॉ. नरेश विठोबा जाधव, रा.बौध्दवाडी,सोमेश्वर रत्नागिरी, गुन्हा रजि.क्र.124/2020 रत्नागिरी पो.रत्नागिरी.**


मी नरेश विठोबा जाधव रा. बौध्दवाडी, सोमेश्वर, ता.जि.रत्नागिरी येथिल रहिवासी असुन अनु.जाती/जमातीचे व्यक्ती असताना माझे विरोधात मला मारहाण करण्यात येवुन जिवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानुसार मी, वकील असल्याने रत्नागिरी ग्रामिण पो. स्टेशन मध्ये दि.11.11.2020 रोजी ॲट्रोसिटी ॲक्ट अंतर्गत तक्रार नोंद केली होती. त्यानुसार शासनाकडुन मला 2 लाख अर्थसहाय्य मंजुर करण्यात येवुन रक्कम रू.150000/- इतकी FIR व चार्जशिट कोर्टात दाखल झाल्यानंतर पिडित या नात्याने अर्थसहाय्य मिळाले आहे. माझ्या सारख्या मनमिळावू उच्चशिक्षीत दलित समाजाचा उध्दार करण्याची मानसिकता असलेल्या व्यक्तीला या पुढील कोर्टाची लढाई लढण्यासाठी शासनाने न्याय दिल्याबद्दल शासनाचे मी लाख लाख आभारी आहे.





**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125व्या जयंती वर्षानिमित्त अनु.जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असेल्या स्थळांचा विकास करणे अंतर्गत**

**मौजे कापडगांव, ता.जि.रत्नागिरी बौध्द विहार बांधणे ( लेखाशीर्ष 2225-डी-823)**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125व्या जयंती वर्षानिमित्त अनु.जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असेल्या स्थळांचा विकास करणे अंतर्गत बौध्दजन हितवर्धक संघ, कापडगांव, ता.जि.रत्नागिरी या संस्थेच्या अंतर्गत मौजे कापडगांव, ता.जि.रत्नागिरी येथील बौध्द विहार व परिसर विकास या कामास मंजुरी देण्यात आलेली असून सदर बौध्दविहार व परिसर विकास करणे या कामास रु.1,26,47,114/- निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर बौध्द विहाराचे काम पुर्ण झालेले असून बौध्दविहाराच्या परिसरामध्येच स्वतंत्र तीन मजली इमारत स्वतंत्र बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर इमारतीमध्ये विपश्यना केंद्र, ग्रंथालय इत्यादी उपक्रम संस्थेमार्फत प्रस्तावित आहेत.









## मौजे कापडगांव, ता.जि.रत्नागिरी बौध्द विहार बांधणे - लेखाशीर्ष 2225-डी-823

**सेक्रेटरी बौध्दजन हितवर्धक संघ,कापडगांव यांचे मनोगत :**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपुर मुक्कामी बौध्द धम्माची दिक्षा घेतली व आपल्या अनुयायांना दिली. बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरीत होऊन त्या वेळीचे पदाधिका-यांनी 1 जानेवारी 1957 रोजी संघाची व विहाराची स्थापना केली. बाबासाहेबांना चळवळीला संरक्षण करीता समता सैनिक दलाची स्थापना केली. या समता सैनिक दलाला वाडीतील काही मंडळी होती. त्यांना बाबासाहेबांच्या अत्ती विहारात आपल्या तेव्हा पासुन त्यांने जतन करण्याचे काम संघाने दिले. या गोष्टीची दखल महाराष्ट्र शासनाने घेवुन डॉ.बाबासाहेबांच्या 125 व्या जयंती वर्षा निमित्त बौध्दस्थळाचा विकास करणे कामी निधी मंजुर केला. मी प्रथम महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो.

शासनाच्या मंजुर निधीतुन विहाराचे काम पुर्ण झाले. कोकणात अशा एकारचे मान्यदिव्य प्रेक्षणिय स्थळ प्रथमच निर्माण करण्यात आले. त्यामुळे या स्थळाला पर्यटक भेटी देतात. त्यामुळे वाडीत व

गावात विविध सोई सुविधा निर्माण झाले आहेत. वाडीतील व गावातील लोकांना रोजगार निर्माण झाला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनी कोकणातील अनुयायांना मुंबई येथे जाणे शक्य नाही. अशांना या ठिकाणी अभिवादन करण्याची सोय निर्माण झाली याचे आम्हाला समाधान वाटते. प्रेक्षणिय स्थळ झाल्याने वाडीचे, गावाचे राहणीमान उंचावेल. यापुर्वी गावाला महाराष्ट्रातील पहिले तंटामुक्त गाव सन्मानित करण्यात आले आहे. हे प्रेक्षणीय स्थळ झाल्याने वाडीला व गावाला विशेष महत्व निर्माण झाले आहे. आमचे संघाने नविन विहाराचा केलेला संकल्प आणि त्याला महाराष्ट्र शासनाने दिलेली आर्थिक मदत यामुळे आमचे येथे भव्य असे प्रेक्षणिय स्थळ निर्माण झाले. त्यामुळे संघाच्या वतीने मी महाराष्ट्र शासनाला धन्यवाद देतो.

**मौजे कापडगांव, ता.जि.रत्नागिरी बौध्द विहार बांधणे**
**( लेखाशीर्ष 2225-डी-823)**

**श्री विघ्नेश विश्वास कोत्रे, सरपंच कापडगांव यांचे मनोगत :**

**“शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा”!** हा मुलमंत्र बाबासाहेबांचा रत्नागिरी शहरापासून सुमारे वीस किलोमीटर अंतरावर असलेले महाराष्ट्रातील पहिले तंटामुत्क पुरस्कार प्राप्त गांव कापडगांव. गावातील बौध्दवाडी येथे भव्य दिव्य विहार उभारण्यात आले



आहे. विहार उभारणीसाठी महाराष्ट्र शासन व आणि बौध्दजन हितवर्धक संघ ग्रामीण व मुंबई सर्व पदाधिकारी ग्रामस्थ व महीला मंडळ तरुण वर्ग यांचे सहकार्य लाभले. विहारमुळे तालुक्यांतील अन कापडगांवातील समाजबांधवांना एकत्र बसुन विचार विनिमय करणे सोईचे झाले.  जयंती उत्सव मोठया प्रमाणात साजरे करणे सोईचे झाले. सदर विहारामध्ये वाचनालयाची सुविधा उपलब्ध झाल्याने समाजातील अनेकांना याचा फायदा होवू लागला. आमच्या कापडगांव मध्ये भगवान गौतम बुध्द अन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य दिव्य विहार आहे याचा सार्थ अभिमान आम्हा कापडगांव वासीयांना आहे.

## प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना

**प्रस्तावना :** प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजने अंतर्गत रत्नागिरी जिल्हयातील तीन गांवाची निवड करण्यात आली असून त्यामध्ये (1) दाभोळे खु., ता.संगमेश्वर, (2) नांदगांव खु., ता.चिपळूण, (3) अलसुरे, ता.खेड यांचा समावेश आहे. त्यामध्ये मौजे अलसुरे : नळ पाणी योजना दुरुस्ती, पाणी साठवण टाकी बांधणे, स्ट्रीट लाईट इत्यादी, मौजे दाभोळे खुर्द : पाणी साठवण टाकी, नळ पाईपलाईन योजना, कंपाऊंड वॉल इत्यादी व मौजे नांदगाव खुर्द : नळ पाणी योजना करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

### (1) दाभोळे खु., ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी :-



राजेश इंदूलकर, ग्रामसेवक

ग्रामपंचयात दाभोळे हे गाव रत्नागिरी कोल्हापूर नागपूर या राष्ट्रीय महामार्ग वर वसलेले आहे. आमच्या ग्रामपंचायत मध्ये दोन महसुली गावे असून त्या पैकी दाभोळे खुर्द हे आहे त्या महसूल गावची ऐकून लोकसंख्या ७९१ असून सदर ची सर्व लोकसंख्या ही अनु. जाती आहे एकूण गावात राहणारी कुटुंबे ही 180 असून सर्व जण एक विचाराने व सलोख्याने रहात आहेत. पूर्ण महसूल गावची अनु.जाती ची लोक असल्याने आमच्या गावची निवड सन २०१९-२० मध्ये प्रधानमंत्री संसद आदर्श गाव म्हणून निवड झाली व गावच्या काय गरजा आहेत याचा बारकाईने पाहणी व शिवार फेरी घेऊन गरज व भौतिक सुविधा कोणत्या आहेत व आवश्यक गरजा काय आहेत हे पाहून पंच वार्षिक आराखडा ग्रामसभेत सर्वांच्या सहमतीने तयार करून मंजुरी साठी देणेत आला व गावाने अग्रक्रमाने सुचवलेली कामे १ जुनी पाणी पुरवठा योजना पूर्ण पणे साठवन टाकी सह उभारणे व घरगुती कनेक्शन देने ही कामे मंजूर होऊन मुदतीत पूर्ण झालेले आहेत त्या मुळे सर्व कुटुंबाना पुरेसे मुबलक पाणी मिळत आहे. २ प्रथम वर्षीच्या आराखड्यात वरील कामासह अंगणवाडीला बंदीस्त संरक्षण भिंत बांधनेत आले आहे उर्वरित आराखड्यातील कामे मंजुरीसाठी आहेत तीही आमची ग्रामपंचयत पूर्ण करेल सदर योजने मुळे तेथील लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे व राहणीमान उंचवण्यात मदत झाली आहे.

### (2) नांदगांव खु., ता. चिपळूण, जि. रत्नागिरी :-



संजिवनी कांबळे,



प्रिती सुर्वे, ग्रामसेवक

प्रधानमंत्री अनु.जाती अभ्युदय योजना या योजनेमध्ये नांदगाव खुर्द ता.चिपळुण जि.रत्नागिरी या गावाची निवड झाली आहे. आदर्श गाव म्हणजे एक मॉडेल गाव असणे असे आहे. म्हणजे सदर गावाचा विकास हा एकत्ररित्या या योजनेमधुन करणे. त्याप्रमाणे आमच्या गावाने पंचवार्षिक आराखडा तयार करुन कन्व्हर्जन समितीच्या विचाराने कामे सुरु केली.

गावामध्ये विविध विकासात्मक कामे करुन गाव उत्कृष्ट करणे हा या योजनेचा उद्देश आहे. त्याप्रमाणे आमच्या गावाने टँकर मुक्त गाव होणेसाठी पाण्याच्या कामाला प्रथम प्राधान्य दिले. त्याप्रमाणे शासन स्तरावरुन सदर काम मंजुर होवुन काम सुरू करणेत आले. या कामाचा फायदा आमच्या गावातील सर्व ग्रामस्थांना झाला अशीच विकासात्मक उत्कृष्ट कामे होणेसाठी शिल्लक कामांना शासन स्तरावरुन अनुदान प्राप्त होईल अशी आमची अपेक्षा आहे.

प्रधानमंत्री अनु.जाती अभ्युदय योजनेमध्ये नांदगाव खुर्द ता.चिपळुण ग्रामपंचायत सरपंच श्रीम.संजिवनी संदिप कांबळे व ग्रामसेवक श्रीम.प्रितीताई अनंत सुर्वे तसेच ग्रामपंचायत उपसरपंच, ग्रामपंचायत

सदस्य व सर्व गावाच्या वतीने आभार व अभिनंदन करतो की नांदगाव खुर्द गावाची आदर्श गाव म्हणुन ओळख निर्माण झाली.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

**योजनेचे नांव :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

**शासन निर्णय :** शासन निर्णय क्र. दवसू - 2015/प्र.क्र. 347 / अजाक / दिनांक 09 मार्च 2018

**लाभाचे स्वरूप :**

1) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत नागरी व ग्रामीण भागातील अनुसुचीत जाती व नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी सदर योजना शासन निर्णय क्र. दवस 2015/प्र. क्र. 347 / अजाक मंत्रालय मुंबई दिनांक. 09 मार्च 2018 अन्वये सन 2018-19 या आर्थिक वर्षापासून योजना सुरु करण्यात आलेली आहे.
2) मा. लोकप्रतीनिधिनी सुचविलेली कामे संबंधित लोकप्रतिनिधी ज्या कार्यालयीन यंत्रणेकडून कार्यान्वित करावयाची आहेत त्या कार्यान्वित यंत्रणेचे नाव तसेच यंत्रणेची तत्वत: मंजुरी अंदाजित किंमतीच्या कामांचे सविस्तर नकाशे व अंदाजपत्रके संबंधितानी सादर केल्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.
3) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील वस्ती सुधार योजनेतंर्गत निधी प्राप्त होऊनही पुरेशा निधीअभावी गावातील/वस्त्यांमध्ये विकास कामे पुरेशा प्रमाणात झालेली नाहीत अशा भागातील लोकप्रतिनिधीना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे ग्रामविकास, अल्पसंख्याक आणि नगर विकास विभागाच्या धर्तीवर शासन स्तरावरून थेट निधी उपलब्ध करून देण्याची राज्यस्तर योजना आहे.
4) या योजने करीत लोकप्रतिनिधी म्हणून केवळ विद्यमान खासदार व आमदार यांच्याच प्रस्तावाचा विचार होईल.

**योजनेतंर्गत घ्यावयाची कामे :** सदर योजनेतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील/ गावातील आणि पुरवठा, मलनि:सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटार बांधणे, स्मशान भूमीचा विकास करणे, पथदिवे, पर्जन्य पाण्याची निचरा, सार्वजनिक सुलभ शौचालये, ग्रंथालय/ अभ्यासिका, व्यायाम शाळा या व्यतिरिक्त स्थानिक वस्तीतील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेता विकास कामांना समावेश शासन स्तरावरून करण्यात येईल.


**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (2225-F058)**
**अंतर्गत मंजूर कामांची माहिती**

**कामाचे नांव : मौजे चाफेरी अनु.जाती वस्ती ते ब्राम्हणवाडी कडे जाणारा रस्ता तयार करणे, ता.जि.रत्नागिरी**

**सन : 2018-19, मंजूर कामाची रक्कम रु.10,00,000/-**

**स्थानिक वस्तीमधील लाभार्थ्यांचे मनोगत : श्री.प्रभाकर कृष्णा भातडे, मु.चाफेरी, पो.सैतवडे, ता.जि.रत्नागिरी**

मी, सदर गावातील रहिवासी असून गेले अनेक वर्षे रस्ता खराब होता. यामुळे गावातील मुख्य वस्तीकडे जाण्यासाठी पावसाळयामध्ये अनेक अडचणी निर्माण होत होत्या. तसेच ज्येष्ठ नागरीक व शालेय विद्यार्थी यांना प्रवास करतांना जिव मूठीत घेऊन ये-जा करावी लागत असे. परंतू शासनाच्या या सामाजिक विकास योजनेमार्फत काम मंजूर होऊन पुर्ण करणेत आले असल्याने रहदारीचा प्रश्न सुटलेला आहे. याबद्दल वाडीतील नागरीक या नात्याने शासनाचा मी आभारी आहे.







**कामाची पाहणी करतांना समाज कल्याण कार्यालयातील तालुका समन्वयक श्री.अमोल पाटील**

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (2225-F058)
## अंतर्गत मंजूर कामांची माहिती

**कामाचे नांव : मौजे कळझोंडी फाटा नं.1, मुख्य रस्ता अनु.जाती वस्तीतून कळझोंडी फाटा क्र.2 पर्यंत कारपेट**
**करणे, ता.जि.रत्नागिरी**

**सन : 2019-20, मंजूर कामाची रक्कम रु.5,00,000/-**

**स्थानिक वस्तीमधील लाभार्थ्यांचे मनोगत : श्री.सत्यम पवार, मु.पो.कळझोंडी, ता.जि.रत्नागिरी**

मी, सदर वाडीतील रहिवासी असून गेले अनेक वर्षे रस्ता खराब होता. ज्येष्ठ नागरीक व महिला यांना प्रवास करतांना जिव मूठीत घेऊन ये-जा करावी लागत असे. यामुळे गावातील मुख्य वस्तीकडे जाण्यासाठी पावसाळयामध्ये विद्यार्थ्यांना अनेक अडचणी निर्माण होत होत्या. परंतू शासनाच्या या सामाजिक विकास योजनेमार्फत काम मंजूर होऊन पुर्ण करणेत आले असल्याने रहदारीचा प्रश्न सुटलेला आहे. याबद्दल महाविद्यालयीन विद्यार्थी या नात्याने शासनास मन:पुर्वक धन्यवाद देतो.







**कामाची पाहणी करतांना समाज कल्याण कार्यालयातील तालुका समन्वयक श्री.अमोल पाटील**

**जिल्हा वार्षिक योजना-अनुसूचित जाती उपयोजना**

## 3 %नाविन्यपूर्ण योजना सन 2021-22

**प्रस्तावाना :** सन 2021-22 मध्ये अनु.जाती उपयोजना-3 % नाविण्यपूर्ण योजनेसाठी रु. 53.43 लाख मंजूर नियतव्यय पैकी रु.13,59,750/- इतका निधी सन 2021-22 मध्ये नाविण्यपूर्ण योजनेसाठी खर्च करणेत आला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र.विघयो-2016/प्र.क्र.230/विघयो, दि.22.3.2017 अन्वये नाविन्यपूर्ण योजनेतून समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या अनुदानित मुलां/मुलींच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत वाढ व्हावी व त्यांची कौशल्यवृध्दी होवून बुध्दीमत्ता सुधारावी, त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या उद्देशाने संगणक संच, स्कॅनर व प्रिंटर या साहित्यांचा वसतिगृहांना 3 % नाविन्यपूर्ण योजनेतुन पुरवठा करणेत आला. . सन 2021-22 मध्ये तत्कालिन जिल्हाधिकारी रत्नागिरी मा.डॉ.श्री बी.एन.पाटील, तत्कालीन सहाय्यक आयुक्त,रत्नागिरी मा. श्री.एस.एस.चिकणे यांचे कालावधीत 3 % नाविण्यपूर्ण योजना राबविणेत आली आहे.

**फलनिष्पत्ती :**

- मागासवर्गीय विद्यार्थ्याना शालेय जीवनातच संगणकची ओळख होणेस मदत झाली.
- जगभरातील शिक्षण, आरोग्य इ.विविध उपक्रमांची माहिती उपलब्ध होणेस मदत झाली. माहिती व तंत्रज्ञानाची ओळख होऊन त्यांच्या कौशल्यबुध्दीत वाढ होण्यास मदत झाली.
- जिल्हयातील 11 अनुसुचित जातीची मान्यता असलेल्या अनुदानित वसतीगृहातील विद्यार्थ्याना लाभ झाला.

**विद्यार्थी मनोगत :**






**समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेले**
**अनुदानित मुलां/मुलींच्या वसतिगृहांमध्ये पुरवठा करण्यात आलेल्या संगणक, इ.साहित्यांचा**
**लाभ घेतांना विद्यार्थी**






**समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेले**
**अनुदानित मुलां/मुलींच्या वसतिगृहांमध्ये पुरवठा करण्यात आलेल्या संगणक, इ.साहित्यांचा लाभ घेतांना विद्यार्थी**












## जिल्हा वार्षिक योजना-अनुसूचित जाती उपयोजना


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

**कामाचे नांव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

**योजनेचे स्वरुप :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, महाराष्ट्र शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. विघयो-2016/प्र.क्र.176/4अे, दिनांक 05/01/2017 या अन्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबविण्यात येत आहे. परंतू अनियमित व खंडित पावसामुळे सिंचन सोई उपलब्ध नसल्याने शेतांतील पिकांचे होणारे नुकसान टाळून शेतमालाचे उत्पादन वाढवून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी सन 2016-17 पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्यात येत आहे. यामधून शेतकऱ्यांना नवीन सिंचन विहीरीचा लाभ दिला जातो.

**फलनिष्पत्ती :** पॅकेज स्वरुपात नवीन सिंचन विहीर, वीज जोडणी, वीज पंप असा लाभ दिला जातो. व यातून मिळणाऱ्या र.रु.2,50,000/- अनुदानातून खोदकाम, बांधकाम केले गेले. पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. कोरड शेती असलेले लाभार्थ्यांना या योजनेचा खरोखरच चांगला फायदा झाला. ज्यांची आर्थिक परिस्थिती नव्हती अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाल्यामुळे शेतकरी वर्ग सुखावला आहे.

| अ. क्र. | वर्ष | योजनेसाठी प्राप्त झालेला निधी | झालेला खर्च | विहीरीचा लाभ दिलेली संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2017 - 18 | 285.2 | 220.83 | 66 |
| 2 | 2018 - 19 | 252.69 | 176.68 | 57 |
| 3 | 2019 - 20 | 200 | 170.88 | 52 |
| 4 | 2020 - 21 | 200 | 127.33 | 39 |
| 5 | 2021 - 22 | 222.2 | 40.18 | 17 |



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत
## देण्यात आलेले लाभ / लाभार्थी

### नवीन सिंचन विहीर :

**लाभार्थींचे मनोगत सन 2020-21 :**

**लाभार्थींचे नाव : संजय जीवराम पवार, रा. कासे ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी**

या योजनेचा लाभ घेण्याअगोदर आम्ही फक्त पारंपारिक पद्धतीने पावसाळी भात शेती करत होतो परंतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत मला सिंचन विहिर, व वीज पंपाचा लाभ मिळाला व त्यातून माझी शेती पूर्णपणे ओलीता खाली आणली, तेव्हा पासून मला खरीप हंगामात भात शेती, रब्बी व उन्हाळी हंगामात पावटा, चणा, उडीद, विविध प्रकारच्या भाजीपाला इत्यादीचे उत्पन्न मला सहजरित्या घेणे शक्य झाले.



## सिंचन विहीरींचा लाभ घेतलेले इतर लाभार्थी :


















## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत देण्यात आलेले लाभ / लाभार्थी

### वीज पंप :



**लाभार्थीचे नाव : दयानंद सखाराम शिर्के, रा.मूर, ता. राजापूर जि. रत्नागिरी**
**(सन 2020-21)**
**लाभार्थीचे मनोगत :** जिल्ह्यातील बरेचसे शेतकरी यांजकडे आधीपासून विहीर उपलब्ध असलेले असे शेतकरी खूप आहे, पण पाणी उपसा करणेस पंपाची आवश्यकता असलेने बाजारातून उपलब्ध असलेले पंप खूपच महागडे असल्याने शेतकऱ्यांना अडचणी सामना करावा लागत होता, पण जेव्हा या योजनेद्वारे विहीरीवर विद्युत बसविणे आणि जेथे ग्रीडमधून वीज पुरवठा करणे शक्य नसेल तेथे सौर उर्जेतून वीज जोडणी देण्यात येत आहे. त्या माध्यमातून शेतीची उत्पादकता वाढविण्यात मदत झाली.

### वीज जोडणी आकार :

**लाभार्थीचे नाव : सुमित जयराम तांबे रा. शिरवली ता. खेड जि. रत्नागिरी (सन 2020-21)**
**लाभार्थीचे मनोगत :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी अनेक कृषी विषयक योजना देखील राबविण्यात येत आहे. पाणी उपसा करणेसाठी किंवा अन्य कामासाठी शेताच्या ठिकाणी वीज पूरवठा ची सोय नसलेने अडचणी येत होत्या परंतू, व महावितरणा कडे पंचायत समिती कृषी अधिकारी यांनी पाठपूरवठा करुन वीज जोडणी आम्हांला कमी कालावधी मिळवून दिली. वीज जोडणीच्या मिळाल्यामुळे लाभामुळे आम्हां शेतकऱ्यांना पाठबळ मिळाले.

**वार्षिक योजना-अनुसूचित जाती उपयोजना**

## पशुसंवर्धन - अनुसुचित जातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचा गट पुरवठा (75% अनुदान)

**योजनेचे नांव :** अनुसुचित जातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचा गट पुरवठा (75% अनुदान)

**शासन निणर्य :** महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र. जिवायो 2010/प्र.क्र. 305/पदुम 4 मंत्रालय मुंबई 400 032 दि. 22 नोव्हेंबर 2011

**लाभाचे स्वरुप :** 2 दुधाळ जनावरे ( गाय किंवा म्हैस ) अनुदान रक्कम रु. 63,796/-

| प्राप्त तरतूद (रु.लाख) | | झालेला खर्च (रु.लाख) | | लाभार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|---|
| 2020-21 | 2021-22 | 2020-21 | 2021-22 | 2020-21 | 2021-22 |
| 10.00 | 10.00 | 10.21 | 3.83 | 16 | 6 |


## अनुसुचित जातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचा गट पुरवठा



## अनुसुचित जातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचा गट पुरवठा



## अनुसुचित जातीच्या कुटुंबांना दुभत्या जनावरांचा गट पुरवठा



### जिल्हा वार्षिक योजना-अनुसूचित जाती उपयोजना

## पशुसंवर्धन - अनुसुचित जातीच्या कुटुंबांना शेळ्या मेंढ्यांचे गट पुरविणे (75% अनुदान)

**योजनेचे नांव :** अनुसुचित जातीच्या कुटुंबांना शेळ्या मेंढ्यांचे गट पुरविणे (75% अनुदान)

**शासन निर्णय :** महाराष्ट्र शासन कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग शासन निर्णय क्र. पविआ-1020/प्र.क्र.110/पदुम-3, मंत्रालय मुंबई 400 032 दि. 25 मे 2021

**लाभाचे स्वरुप :** 10 शेळ्या व 1 बोकड अनुदान रक्कम रु. 58,673/-

| प्राप्त तरतूद (रु.लाख) | | झालेला खर्च (रु.लाख) | | लाभार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|---|
| 2020-21 | 2021-22 | 2020-21 | 2021-22 | 2020-21 | 2021-22 |
| 10.00 | 10.00 | 10.41 | 17 | 29 | 17 |

## अनुसुचित जातीच्या कुटुंबांना शेळ्या मेंढ्यांचे गटाचे वाटप




.

## अनुसुचित जातीच्या कुटुंबांना शेळ्या मेंढ्यांचे  गटाचे वाटप

### पशुसंवर्धन विभाग ,पंचायत समिती चिपळूण

विशेष घटक योजनेमधून शेळी गट पुरवठा 75 % अनुदान . सन . 2020-2021

ः श्री . राजेंद्र कृष्णा मोहिते रा . कोळकेवाडी ता . चिपळूण जि . रत्नागिरी यांचे शेळी गट ( 10 +1 ) खरेदी केलेल्या शेळयांना व बोकडाना बील्ले मारल्यानंतर लाभार्थी समवेत काढलेले छायाचित्र .



# अनुसुचित जातीच्या कुटुंबांना शेळ्या मेंढ्यांचे  गटाचे वाटप

53

विशेष घटक योजना अनुसुचित जातीच्या लाभधारकांना शेळीगट पूरवठा 20-21 लाभार्थी श्री .दीपक गंगाराम कांबळे रा. विवली ता. लांजा जि. रत्नागिरी.









## जिल्हा वार्षिक योजना-अनुसूचित जाती उपयोजना

## अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये पथदीप उर्जीकरण योजना

**योजनेचे नांव :** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये पथदीप उर्जीकरण योजना

**शासन निणर्य :** उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-2013/प्र.क्र.128/ऊर्जा-5, दि.30.12.2022

**लाभाचे स्वरुप :** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये पथदीप उर्जीकरण योजने अंतर्गत वस्त्यांमध्ये पथदीप बसविणे

| सन | प्राप्त तरतूद (रु.लाख) | झालेला खर्च (रु.लाख) | लाभार्थी संख्या (वाडया/वस्ती) |
|---|---|---|---|
| 2020-21 | 19.72 | 14.02 | 7 |

## लाभार्थी मनोगत

**श्री.खेडेकर उपसरपंच, निर्मल ग्रामपंचायत उमरोली ता. चिपळूण :**



मौजे उमरोली बौध्दवाडी येथे स्ट्रीट लाईटसाठी महावितरण कंपनीकडे मागणी केलेली होती. सदर मागणीनुसार उमरोली बौध्दवाडी मध्ये स्ट्रीटलाईटचे काम पूर्ण झालेले असून मी व आमचे सर्व ग्रामस्थ समाधान व आनंद व्यक्त करीत आहे. सदर ठिकाणी अंधार होता. परंतु स्ट्रीटलाईटचे काम पूर्ण झाल्यामुळे सदर परिसर प्रकाशमय झालेला आहे. त्याबद्दल आम्ही महावितरण कंपनीचे आभार व्यक्त करतो. धन्यवाद !

**श्री कल्पेश ओनकर ग्रामस्थ:**



आमच्या दलित वस्तीमध्ये रस्त्यावर लाईटचे दिवे नव्हते. त्यामुळे संध्याकाळ नंतर रस्त्यावर अंधार असल्याने आम्हाला घराबाहेर पडणे मुश्किल होते. तसेच आमची वस्ती ही जंगलमय भागात असल्याने जंगली प्राण्यांचाही वापर रात्री होत असतो. आता शासनाच्या योजनेतून आपण वस्तीतील पोलवर लाईट बल्ब लावल्यामुळे पुरेसा प्रकाश पडतो. त्यामुळे रात्री रस्त्याने जाणे सोईचे व भयमुक्त झाले आहे.

## अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये लावण्यात आलेले पथदिप








## लेखा निरीक्षण शाखा

मा.आयुक्त सो, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे व मा.प्रादेशिक उपायुक्त, मुंबई विभाग, मुंबई यांच्या आदेशान्वये व मार्गदर्शनामुळे तसेच वेळोवेळी मिटींगच्या माध्यमातून सन 2021-2022 व 2022-23 मध्ये एकूण 17 प्रलंबित परिच्छेदापैकी 17 परिच्छेदांचे अनुपालन सादर करण्यात आले त्यापैकी 9 अनुपालन मान्य करण्यात आलेले असून उर्वरित 7 प्रलंबित परिच्छेदांचे सुधारीत अनुपालन पुनश्च सादर करण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रलंबित परिच्छेदांचा झालेला निपटारा हा खरच उल्लेखनीय आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे :

**मा.महालेखापाल प्रलंबित परिच्छेद बाबतचा सद्यस्थिती अहवाल :**

| अ. क्र | कार्यालयाचे नाव | कालावधी/ तपशिल | उपस्थित करण्यात आलेले परिच्छेद संख्या | अनुपालन सादर केलेली संख्या | अनुपालन मान्य केलेली संख्या | अद्याप अनुपालान सादर न केलेली संख्या | आज अखेर एकुण परिच्छेद संख्या (4-6) | शेरा/ अनुपालन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | सहाय्य आयुक्त समाज कल्याण कार्यालय, रत्नागिरी | 1.8.2010 ते 28.2.2018 | 12 | 12 | 5 | 0 | 7 | - |
| 2. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागसवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, जेल रोड, रत्नागिरी | 1.2.2002 ते 28.2.2018 | 5 | 5 | 4 | 0 | 1 | - |
| | **एकूण** | | **17** | **17** | **9** | **0** | **8** | |

वरील प्रमाणे प्रलंबित परिच्छेदापैकी सन 2020.2021 ते 2022.2023 या कालावधी मध्ये या कार्यालयाचे व अधिनस्त शासकीय वसतीगृह यांचे एकूण 9 परिच्छेद मान्य करण्यात आले असल्याबाबत मा.महालेखापाल कार्यालयाने कळविले आहे. तसेच मा.आयुक्त, समाज कल्याण पुणे व मा.प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार उर्वरित या कार्यालयाचे 6 आक्षेपीत परिच्छेद महालेखाकार कार्यालय मुंबई यांना अनुपालन अहवाल सादर करणेत आलेले आहेत. उर्वरित या कार्यालयाचा 1 व वसतीगृहाचे 1 आक्षेपित परिच्छेद सादर करणेची कार्यवाही तात्काळ करणेत येत आहे.

**खात्यांतर्गत प्रलंबित परिच्छेद** :

या कार्यालयाचे व कार्यालयाच्या अधिनस्त वसतिगृहे व महाविद्यालये यांचे अंतर्गत लेखापरिच्छेदांचे एकुण 241 उपस्थित परिच्छेदांपैकी 194 परिच्छेदांचे अनुपालन सादर करण्यात आले असुन 107 इतके परिच्छेद मान्य करण्यात आले आहेत. प्रलंबित 47 परिच्छेदांचे सुधारित अनुपालन अहवाल सादर करण्याची कार्यवाही करणेत येत आहे.

**भांडार पडताळणी प्रलंबित परिच्छेद** :

या कार्यालयाची तसेच कार्यालयाच्या अधिनस्त वसतिगृहे यांचे भांडार पडताळणी करणेत आलेली नाही.

**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी**

**उद्देशिका पुस्तिका**

**शासन आपल्या दारी...**

रत्नागिरी जिल्हयातील जनतेला पूर्वी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे जावे लागत असे. ऑक्टोबर 2007 मध्ये विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २ रत्नागिरी ची स्थापना झाली. त्यामध्ये रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन जिल्हयाचे कामकाज चालत असे. कालांतराने जनतेच्या सोईसाठी दि. 21 नोव्हेंबर 2016 पासून जिल्हानिहाय समित्या स्थापन करण्यात आल्या.

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे राज्यातील विविध मागासवर्गीय प्रवर्गातील लोकांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याचे कामकाज केले जाते. त्यासाठी महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य व जातीविषयक पुरावे सादर करण्यासाठी शासनाने वेगवेगळे मानीव दिनांक प्रवर्गानुसार कायद्याने निश्चित केले आहेत. अनुसूचित जातीसाठी दि. 10 ऑगस्ट 1950, विमुक्त जाती, भटक्या जमातीसाठी दि. 21 नोव्हेंबर 1961 आणि इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांचेसाठी दि. 13 ऑक्टोबर 1967 हे मानीव दिनांक आहेत. सदर दिनांकापूर्वीचे पुरावे सादर करणे आवश्यक असते.

इयत्ता १२ वी विज्ञान परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर काही विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, फार्मसी, कृषी अशा उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी त्यांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी कागदपत्रांची छाननी करणे, प्रमाणपत्र देणे इत्यादी प्रक्रीया करण्यासाठी समितीला पुरेसा वेळ आवश्यक असतो. इयत्ता १२ वी विज्ञान परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण विद्यार्थ्यांना निर्माण होऊ नये. हा हेतू लक्षात घेऊन रत्नागिरी समितीमार्फत सन 2015 पासून "शासन आपल्या दारी" या धर्तीवर सहज, सुलभ जात प्रमाणपत्र पडताळणी" या शिबीराचे आयोजन विविध महाविद्यालयात करण्यात येते.

समितीचे अध्यक्ष डॉ. ज्योत्स्ना पडियार व संशोधन अधिकारी संतोष चिकणे यांच्या सहकार्यामुळे समितीचे कामकाज व्यवस्थितरित्या करण्यात येत आहे.

विविध महाविद्यालयात जाऊन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रत्नागिरी चे उपायुक्त तथा सदस्य श्री. प्रमोद जाधव व कार्यालयातील अन्य कर्मचारी हे वेळोवेळी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र पडताळणीबाबतचे सखोल मार्गदर्शन व शंका निरसन करतात. तसेच कार्यालयातील कर्मचारी अभ्यागतांना कार्यालयात मार्गदर्शन करतात. या पुस्तिकेत जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेबाबतची माहिति दिली आहे. सदर पुस्तिकेच्या माध्यमातून होणा-या जनजागृती उपक्रमासाठी मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा.. !



**(प्रमोद जाधव)**

**उप आयुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,**

**रत्नागिरी**

## जात वैधता प्रमाणपत्रा संदर्भात आयोजीत कार्यशाळा

**दि.23 सप्टेंबर 2022**



सेवा पंधरवडा, जातीचे दाखले देणे प्रक्रिया, नियमावली बाबत उप विभागीय अधिकारी यांची कार्यशाळा, दि, 23 सप्टेंबर 2022, रत्नागिरी फोटोत मध्यभागी वक्ते, श्री प्रमोद जाधव, उप आयुक्त समाज कल्याण, उजवीकडे डॉ बी. एन. पाटील ( भा प्र से ) जिल्हाधिकारी, श्री संजय शिंदे अपर जिल्हाधिकारी, डॉ ज्योत्स्ना पडियार , अध्यक्षा तथा अपर जिल्हाधिकारी (नि.श्रे.) तेजस्वीनी पाटील, तहसीलदार या कार्यशाळेस निवासी उप जिल्हाधिकारी, सर्व उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, श्री प्रशांत दाईंगडे विधी अधिकारी उपस्थित होते, दीड तास विस्तृत चर्चा झाली, मा.जिल्हाधिकारी यांनी पूर्ण वेळ थांबुन चर्चेत सक्रिय सहभाग घेतला, उपस्थित अधिकाऱ्यांच्या शंका चे समाधान डॉ ज्योत्स्ना पडियार, श्री प्रमोद जाधव व ऍड प्रशांत दाईंगडे यांनी केले.

## जात वैधता प्रमाणपत्रा संदर्भात आयोजीत कार्यशाळा

**दि.10 नोव्हेंबर 2022**




दिनांक 10 नोव्हेंबर 2022 रोजी मा.देवेंदर सिंह, जिल्हाधिकारी महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रांत व तहसिल कार्यालयात कार्यरत जात प्रमाणपत्र विषय हाताळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांची मार्गदर्शन कार्यशाळा आज आयोजित करण्यात आली आहे. स्थळ - अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी समितेचे अध्यक्ष डॉ. जोत्स्ना पडियार मार्गदर्शन शिबीर मा.प्रमोद जाधव यांनी केले व श्री संतोष चिकणे, संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव उपस्थित होते.

## मनोगत..



**(डॉ. जोत्स्ना पडियार)**
**अपर जिल्हाधिकारी (नि.श्रे.)**
**तथा अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**रत्नागिरी**

## “टीमवर्क व कालबध्द कामाचा आदर्श मंडणगड पॅटर्न”

रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुका हा तसा दुर्गम व डोंगराळ भाग. रत्नागिरी पासून दूर असलेला हा निर्सगरम्य भाग आहे तसा अप्रगतच आहे. परंतू रत्नागिरी जिल्ह्याने देशाला जी महान रत्न दिली त्यापैकी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुळ गाव आंबडवे मंडणगड तालुक्यामध्ये आहे. याभूमी पुत्राच्या पुर्वजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मंडणगड तालुक्याला प्रत्यक्ष भेट देऊन डॉ.प्रशांत नारनवरे, आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे आणि श्री. धम्मज्योती गजभिये महासंचालक, बार्टी, पुणे यांनी “मंडणगड पॅटर्न” नावाची नाविन्यपुर्ण व महत्त्वकांक्षी संकल्पना साकारली. या पुण्यभूमीतील इयत्ता 11 वी आणि 12 वी विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व पर्यायाने जातवैधता प्रमाणपत्र देण्याची संकल्पना मांडली गेली. तसेच त्यानंतर इयत्ता 10 वी तील सर्व विद्यार्थ्यांना जातीचा दाखला व त्यानंतर इयत्ता पहिली ते नववीतील विद्यार्थ्यांना टप्याटप्याने जात प्रमाणपत्र वाटप करणे अशी महत्त्वकांक्षी योजना मंडणगड पॅटर्नच्या माध्यमातून राबिवण्यात येत आहे. दि. 18 ऑक्टोबर 2022 रोजी मंडणगड येथे या योजनेचा आराखडा तयार करण्यात आला.

मंडणगड तालुक्यातील विज्ञान शाखेतील इयत्ता 11 वी आणि 12 वीच्या सर्व विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने तसेच या तालुक्यातून पहिला पथदर्शी कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने मा.डॉ.प्रशांत नारनवरे,आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे आणि श्री. धम्मज्योती गजभिये महासंचालक, बार्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. देवेंदर सिंह जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. त्याची सुरूवात दि.10 नोव्हेंबर 2022 रोजी सर्व तहसिलदार व प्रांतधिकारी कार्यालयातील जात प्रमाणपत्र संबंधी काम करणा-या अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सविस्तर प्रशिक्षण घेऊन करण्यात आली. त्यानंतर सर्व रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची दि.11.11.2022 ऑनलाईन बैठक व मंडणगड मधील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात आली. याबैठकीमध्ये मंडणगड पॅटर्नची अंमलबजावणी करण्याची दृष्टीने महाविद्यालयांची भुमिका व त्याबाबत कालबध्द कार्यक्रम यावर अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच याबाबत महाविद्यालयांना येणा-या अडचणीबाबत चर्चा करण्यात आली व सर्व महाविद्यालयांना कार्यक्रमाची कालबध्द रुपरेषा आखून देण्यात आली. याबैठकीनंतर अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी दि.14 नोव्हेंबर ते 17 नोव्हेंबर 2022 या कालावधीत रत्नागिरीतील दापोली ते राजापूर या सर्व तहसिल/प्रांत कार्यालयांमध्ये अथवा सर्व

कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जाऊन तेथील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची समक्ष बैठक घेतली. सदर बैठकीस संबंधित महाविद्यालयाचे संपर्क अधिकारी, सेतू व सीएससी (CSC) केंद्रातील प्रतिनिधी देखील उपस्थित होते.

या बैठकांमध्ये प्रत्येक महाविद्यालयाने या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले तसेच त्यासाठी इयत्ता 11 वी आणि 12 वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालकांची तात्काळ पालक सभा घेऊन जातपडताळणीसाठी ऑनलाईन अर्ज करणेबाबत आवाहन करण्याबाबत सुचना देण्यात आली. याबाबत दि.14 नोव्हेंबर 2022 रोजी स्वत: अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी यांनी मंडणगडमधील पालक सभेस उपस्थित राहून सर्व पालकांना जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत आवाहन केले. परिणामत: दोन दिवसात मंडणगड मधील सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज दाखल झाले व त्याच्या प्रती महाविद्यालयांकडे जमा झाल्या. त्यासोबत दापोली तालुक्यातील महाविद्यालयांनी देखील स्वयंप्रेरणेने या पथदर्शी कार्यक्रमात सहभागी होण्याची विनंती केली. त्यानुसार या सर्व महाविद्यालयांनी विक्रमी वेळेत अर्ज समिती कार्यालयाकडे सादर केले. या सर्व अर्जदार विद्यार्थ्यांना दि.25 व 26 नोव्हेंबर2022 रोजी अनुक्रमे दापोली व मंडणगड येथील कार्यक्रमामध्ये मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्या हस्ते जातवैधता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत.

मंडणगड पॅटर्न हा टीमवर्क- गटकार्य यांचा एक उत्तम नमूना व आदर्श आहे. या कार्यक्रमामध्ये महसूल व समाज कल्याण विभागातील सर्व अधिकारी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, लिपीक संवर्गातील कर्मचारी, सेतू केंद्रातील कर्मचारी यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली वरील लक्ष गटातील विद्यार्थ्यांना विनाविलंब जात प्रमाणपत्र/ दुरूस्त प्रमाणपत्र वितरीत केले. यामध्ये सर्व महाविद्यालयांनी फार मोठा वाटा उचलला. पालकसभा घेण्यापासून विद्यार्थ्यांना बोनाफाईड प्रमाणपत्र देणे, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन/ मदत करणे, विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज गोळा करणे, त्यांचा तपासणी व त्रुटी पुर्तता करणे, प्रमाणपत्रांना साक्षांकीत करणे इ. सर्व कामे अत्यंत वेगाने पुर्ण केली. त्याचबरोबर समाज कल्याण विभागातील सहाय्यक आयुक्त यांनी सर्व महाविद्यालयांशी समन्वय साधणे, सर्व महाविद्यालयाच्या बैठकांचे नियोजन करणे, कार्यक्रमाचा प्रचार व प्रसिध्दी करणे ही सर्व कामे तत्परतेने केली. या सर्व यंत्रणानी एकत्रित व सुसूत्रतेने काम करून उत्तम गटकार्याचा आदर्श प्रस्थापित केला आहे.

## मनोगत..



**(प्रमोद जाधव)**
**उप आयुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**रत्नागिरी**

## (खरे खुरे पारितोषिक)

पुणे येथे बार्टी संस्थेच्या कार्यालयात महाराष्ट्रातील सर्व 36 समित्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत विविध बाबतीत चांगले काम करणाऱ्या 3 समित्यांना पारितोषिक देण्यात येईल असे घोषित करण्यात आले. 36 समित्यांत कोणाला पारितोषिक मिळेल हा उत्सुकतेचा विषय होता. बैठकीच्या वेळी घोषणा करण्यात आली. प्रथम पारितोषिक वर्धा समिती, द्‌वितीय पारितोषिक रत्नागिरी समिती. मी रत्नागिरी समितीमध्ये नोव्हेंबर 2014 पासून काम करत होतो. तेथे हजर झाल्यापासून विविध बाबतीत काही बदल जाणीवपूर्वक घडवून आणले. यापूर्वीही बार्टी मध्ये झालेल्या बैठकांच्या किंवा प्रशिक्षणाचे वेळी रत्नागिरी समितीने अंगीकारलेल्या काही बेस्ट प्रॅक्टिसेस चे सादरीकरण मी केले होते. त्याची नोंद अशाप्रकारे घेण्यात आली.

**लोकाभिमुख प्रशासन -** सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना मी सुरूवातीला हजर झाल्यावर सांगितले की आपण या खुर्चीवर बसलेले आहोत. लोकांच काम असल्याने ते आपल्याकडे येतात. विनंती करतात, वेळप्रसंगी आर्जव करतात. म्हणून आपण स्वतःला फार मोठे झालो असे अहंकाराने समजणे योग्य नाही. जो मानसन्मान मिळतो तो त्या खुर्चीमुळे मिळतो . पण तो तात्कालिक आहे. प्रत्यक्षात आपण जनतेच्या सेवेसाठी असल्याने त्यांना योग्य ती वागणूक देणे गरजेचे आहे. अन्यथा बदली झाल्यावर किंवा सेवानिवृत्त झाल्यावर कोणीही विचारत नाही. या सर्वांचे भान ठेवणे आवश्यक आहे.

**कार्यालयीन कामकाज सुधारणा -** जात पडताळणी समितीचे काम हे किचकट व कंटाळवाणे समजले जाते. लोकांची कामे अडली की लोक समिती कार्यालयात येतात. त्यांची फाईल शोधण्यात व बोलण्यात वेळ जातो. यामुळे कामाचा वेग मंद होतो. कामाचा वेग मंद झाला की लोक परत भेटायला येतात. हे दुष्टचक्र भेदणे अत्यावश्यक आहे हे मी सर्वांना सांगितले. मी येण्यापूर्वी रत्नागिरी कार्यालयांमध्ये काही तथाकथित कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन केले होते. त्याची पुनरावृत्ती मला टाळायची होती. काम वेगाने व सुव्यवस्थित होण्यासाठी काही सोप्या पद्‌धती मी सुरू केल्या. पडताळणीसाठी ज्यावर जातीची नोंद असते अशीच कागदपत्रे प्रामुख्याने आवश्यक असतात. परंतु अर्जदार यांना व्यवस्थित माहिती नसल्याने ते अनेक अनावश्यक कागदपत्रे अर्ज सोबत लावतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांना केवळ आवश्यक कागदपत्रे घेण्याची मी सूचना केली. पूर्वी काही फाईल पंचवीस तीस पानाच्या होत असत. परंतु या पद्‌धतीमुळे पानांची संख्या मोजकी म्हणजे सात-आठ वर आली. जात ही वडिलांकडून किंवा पूर्वजांकडून येते. त्यामुळे हा नातेसंबंध समजण्यासाठी एका विशिष्ट क्रमाने कागदपत्रे लावण्याचे काम सुरू केले. यामुळे फाईल आटोपशीर व समजण्यास सुलभ झाल्या. तसेच त्याचा निपटारा वेगाने करणे सहज शक्य झाले.

काही नागरिक कागदपत्रांमध्ये बदल करून देतात. कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांनाही हे बदल लक्षात यावेत यासाठी मी दहा बारा भिंग विकत घेतली व ते प्रत्येकाला दिले. यां भिंगाचा मदतीने आम्ही हस्ताक्षर बदल ओळखू लागलो. यामुळे चुकीची कामे करणाऱ्यांवर आळा बसू लागला.

**नागरीकांसाठी सोयी-सुविधा -** समितीकडे येणाऱ्या लोकांना जास्त वेळ उभे रहावे लागू नये यासाठी काही उपाय योजना केल्या. कार्यालयात बसण्यासाठी जादा खुर्ची उपलब्ध करून दिल्या. ज्यावेळी गर्दी वाढत असेल त्यावेळी फॉर्म घेण्यासाठी ज्यादा टेबल-खुर्ची ची रचना करून ठेवली. गर्दी वाढल्यास तातडीने अधिक कर्मचारी फॉर्म स्वीकारत. त्यामुळे लोकांना फार काळ ताटकळत उभे राहण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले. याशिवाय नागरिक जिथे फॉर्म सादर करतात त्यांच्यासाठी दोन नवीन स्टॅन्ड फॅन विकत घेतले, जेणेकरून तेथे उभे राहण्याचा फारसा कंटाळा येऊ नये. अर्जदारांना काही लिखाण काम करायचे असेल तर एका टेबल-खुर्चीची सोय केली. समितीचे कामकाज न्यायालय प्रमाणे चालते. त्यामुळे सर्व नागरिकांना सकाळी दहा वाजता बोलवण्याऐवजी काही वेळा दोन किंवा अधिक टप्प्यात बोलावू लागलो. त्यामुळे त्यांचा वेळ वाचू लागला. सुनावणीसाठी आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी खुर्च्या तसेच स्टॅन्ड फॅन उपलब्ध केला.

**मार्गदर्शन उपक्रम -** जात पडताळणीची प्रक्रिया कशी चालते हे समजण्यासाठी विद्यार्थ्यांकरता व्हॅलिडीटी मेक इट इझी (सहज सुलभ जात प्रमाणपत्र पडताळणी) हा मार्गदर्शनपर उपक्रम 2015 पासून सुरु केला. रत्नागिरी मधील कार्यालय प्रमुख यांसाठी जिल्हा परिषदेच्या हॉल मध्ये व्याख्यान दिले. यामुळे कर्मचारी यांचे प्रस्ताव व्यवस्थित येऊ लागले. जातीचे दाखले देतानाच जर व्यवस्थित काळजी घेतली गेली तर पुढील कामकाज सुलभ होते. हा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून जातीचा दाखला देणारे उपजिल्हाधिकारी तसेच त्यांची सर्व यंत्रणा यांच्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 4 वेळा तर सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये एक वेळा बार्टी संस्थेमार्फत प्रशिक्षण शिबिर आयोजित केले. या वेळी मी त्यांना सविस्तर व्याख्यान दिले. तसेच यशदा, पुणे मध्ये या व इतर तीन विषयांवर व्याख्याने दिली.

**कामकाजातील पारदर्शकता -** ज्यांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत त्यांना पत्राद्वारे कळविण्यात येते. मात्र ज्याच्या अर्जामध्ये गंभीर त्रुटी आहेत अशा विदयार्थ्यांना पुढे प्रवेश घेतल्यास गुंतागुंत होऊ शकते याची स्वतंत्र पत्राद्वारे माहिती देऊ लागलो.त्यामुळे विद्यार्थ्यांची संभाव्य नुकसान टाळणे शक्य झाले

वैधता प्रमाणपत्र तयार झाल्यावर अर्जदाराला एसएमएस'द्वारे कळविण्यात येते. तसेच त्याचे प्रमाणपत्र ई-मेल किंवा पोस्टाने पाठवण्यात येते. त्यामुळे अर्जदाराला कागदपत्र परिपूर्ण असतील तर केवळ एकदाच अर्ज देण्यासाठी कार्यालयात हजर राहणे आवश्यक झाले व त्यांचे हेलपाटे वाचले. वेळोवेळी वृत्तपत्र मार्फत जात पडताळणी प्रक्रियेची माहिती देण्यास सुरुवात केली.

**मानवतावादी दृष्टीकोन -** कायद्यानुसार वडिलांची कागदपत्रे जाती दावा सिद्ध करण्यासाठी लागतात. पण एका कुमारी मातेच्या मुलीला जातीचा दाखला मिळत नव्हता. हि एक तांत्रिक व कायदेशीर अडचण होती. मा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास करून अशा परिस्थितीत आईच्या जातीच्या आधारे दाखला देण्याबाबत 9 पानांचा सविस्तर निर्णय समितीने दिला. राज्यातील हा असा सविस्तर निर्णय देण्याचे बहुधा पहिलेच उदाहरण असावे. अध्यक्ष श्री दिलीप हळदे व संशोधन अधिकारी जयंत चाचरकर यांनीही याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याने असा निर्णय घेता आला. अन्य वेळीही त्यांचे उत्तम सहकार्य मिळाले.

**इमारत सुधारणा -** रत्नागिरीत आल्यावर तेथील स्वच्छतागृहात पुरेसे पाणी नसल्याचे निदर्शनास आले. त्यामध्ये खोलवर जाऊन माहिती घेतली. या इमारतीला वर पाण्याची टाकी होती पण खाली पाण्याची टाकी नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे ग्रामपंचायतीचे पाणी फारसे मिळत नव्हते. सार्वजनिक बांधकाम खात्याकडे अर्ज व पाठपुरावा करून इमारतीच्या खाली एक पाण्याची टाकी करून घेतली तसेच त्यावर एक पंपही बसवून घेतला. तसेच ग्रामपंचायत कार्यालयाकडून एक स्वतंत्र नळ कनेक्शन घेतले. यामुळे पाणीटंचाईवर काही प्रमाणात मात करता आली.

**निसर्गरम्य परिसर निर्मीती -** रत्नागिरीमध्ये हे कार्यालय मोठ्या प्रशस्त जागेमध्ये आहे. मात्र इमारतीच्या आजुबाजूला कातळ असल्याने व पाणी टंचाई असल्याने वृक्षारोपण करणे फारसे शक्य होत नव्हते. यावर विविध उपाययोजना केल्या. कातळ फोडून खड्डे खणून त्या मध्ये जैववैविध्य असणाऱ्या झाडांची लागवड केली. अंजन, कांचन, करवंद, बकुळ, पारिजातक, बारमाही लीली रोपे, बोगनवेल, मधुमालती, रान लिली कंद, रानकेळी, पळस, आंबा, फणस, इ. झाडे लावली. श्री. प्रशांत दाईंगडे व संतोष चिकणे यांनी ही सक्रिय सहभाग घेतला. या सर्व उपाययोजनांमुळे परिसर निसर्गरम्य व आल्हाददायक झाला.

**जनतेचे आशीर्वाद -** मुस्लिम समाजात जातीच्या सहसा नोंदी आढळत नाहीत. त्यामुळे सुनावणीला त्यांना जास्त प्रमाणात बोलवावे लागते. एका मुस्लीम समाजातील मासे विक्री करणाऱ्या एका महिलेचे दीर्घकाळ थांबलेले काम मार्गी लागले. ही महिला ईदच्या दिवशी आठवणीने माझ्यासाठी शीरखुर्मा घेऊन आली व आशिर्वाद दिले. असे विविध अनुभव येतात.जनतेचे आशीर्वाद हेही खरेखुरे पारितोषिक होय.
समितीच्या विद्यामान अध्यक्षा डॉ. ज्योत्स्ना पडियार, सदस्य सचिव श्री. संतोष चिकणे, विधी अधिकारी ॲड.श्री. प्रशांत दाईंगडे व सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य तसेच विविध उपाययोजनांमुळे रत्नागिरी समितीचे कामकाज लोकाभिमुख पध्दतीने चालू आहे.



## जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यशाळा

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी यांचेमार्फत श्रीकृष्ण मंदीर सभागृह, मंडणगड, जि.रत्नागिरी येथे सेवा पंधरवडा अंतर्गत जात पडताळणी कार्यशाळा व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम तसेच रमाई आवास योजना (शहरी) व समाज कल्याण विभागाच्या इतर योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास मा.डॉ.प्रशांत नारनवरे (भाप्रसे) आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे, मा.श्री.धम्मज्योती गजभिये महासंचालक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, मा.श्रीम.वंदना कोचुरे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई, मा.श्रीम.ज्योत्स्ना पडीयार, अति.जिल्हाधिकारी (नि.श्रे.) तथा अध्यक्ष जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रत्नागिरी, मा.श्री.उमेश घुले उपायुक्त जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रत्नागिरी, मा.श्री.यादव गायकवाड सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रत्नागिरी, श्री.संतोष चिकणे संशोधन अधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रत्नागिरी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमा प्रसंगी जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्राबाबत मा.आयुक्त यांनी मंडणगड पॅटर्न ची घोषणा करून त्याची सुरूवात मंडणगड, जि.रत्नागिरी येथून सुरूवात केली.




**मा.आयुक्त महोदय यांचे हस्ते जात वैधता प्रमाणपत्राचे वाटप**




**मा.आयुक्त महोदय यांचे हस्ते रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांचा सत्कार**


तमसो-मा-ज्योतिर्गमय..!



महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

- सामाजिक न्याय विभाग -

## :: कार्यालय ::

# सहाय्यक आयुक्त,
# समाज कल्याण, रत्नागिरी


**:: पत्ता ::**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,**
**कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी,**
**पिन-415612**

**दूरध्वनी क्र. 02352-230957,**

**ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in**